

# सरल्या ऋतुचं वास्तव

डॉ. सुनीलकुमार लवटे

# सरल्या ऋतुचं वास्तव

डॉ. सुनीलकुमार लवटे

निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर

**सरल्या ऋतुचं वास्तव**

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

Saralya Rutucha Vastav

Dr. Sunilkumar Lavate

**© डॉ. सुनीलकुमार लवटे**

प्रकाशक

**अनिल म्हमाने/प्रा. डॉ. शोभा चाळके**

**निर्मिती प्रकाशन**

आदित्य सभागृह, ८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,

राजाराम रोड, कोल्हापूर - ४१६००२

मो. ९८२२४७२१०९, ९८९०५५४३४०

Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : **९ ऑगस्ट, २०१२**

सुधारीत/संवर्धित दुसरी आवृत्ती : **१४ एप्रिल, २०१४**

तृतीयावृत्ती : **९ ऑक्टोंबर, २०२२**

मुखपृष्ठ : **मिलिंद यादव**

मुद्रक : **मिरर ऑफसेट, कोल्हापूर**

**ISBN : 978-93-82028-12-3**

**स्वागतमूल्य : रु. २५०/-**

सरल्या ऋतुचं वास्तव
घडविणाऱ्या
साऱ्या
स्मृती, घटना, व्यक्तिंना!

## पूर्व प्रसिद्धी

- **बाल मंदिर** (धडपड भित्तीपत्रिका) १५ ऑक्टोबर, १९६४ (अप्राप्त)
- **तुझ्या सहवासात**–कर्मवीर – (१९७१)
- **न सुटणारे गणित**–कर्मवीर – (१९७१)
- **मी गर्भवंत पुरुष** – रविवार सकाळ, कोल्हापूर (२४ मार्च,१९८५)
- **या वात्सल्य वृक्षाखाली** – वात्सल्य ट्रस्ट स्मरणिका (१९८३)
- **इथे पैसे मोजावे लागतात** – नंदादीप (दिवाळी)– (१९७९)
- **हे त्यांना कसे उमजणार** – पुढारी (रविवार पुरवणी) २२–९–१९८५
- **रस्ते** – रविवार सकाळ, कोल्हापूर (४ एप्रिल, २००४)
- **खूणगाठ** – लोकमत (रविवार पुरवणी) १६ एप्रिल, २००६.
- **आताशा मी बिया खोवायच्या थांबवल्यात** – परिवर्तनाचा वाटसरु (१६ ते ३० जून,२००९)
- **नवा शिक्षक** – जडणघडण मासिक, पुणे (जानेवारी, २००४)

# अनुक्रम


**✻ तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने**

**✻ सुधारित, संवर्धित दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने**

**✻ माझी कविता, माझी जडण घडण...**

| | |
|---|---|
| १) अखेरचा अश्रू | १९ |
| २) अशी अचानक | २० |
| ३) लयलूट | २१ |
| ४) छबी | २२ |
| ५) न सुटणारे गणित | २३ |
| ६) स्वप्नमाला | २४ |
| ७) बोळवण | २५ |
| ८) कृतार्थता | २६ |
| ९) जेव्हा मी प्रेम करतो... | २७ |
| १०) प्रयोजन | २८ |
| ११) मन:स्मृती | २९ |
| १२) प्रमेय | ३० |
| १३) तुझ्या सहवासात... | ३१ |
| १४) वल्गाना | ३२ |
| १५) मातीविना शेती | ३३ |
| १६) तृषार्त | ३४ |

१७) आत्मवंचना ३५

१८ ) कुत्रा ३६

१९) बगळा ३७

२०) उज्वल उद्यासाठी ३८

२१) सावधान ३९

२२) अशी शाळा ४१

२३) मी तुझा राजा गं ४२

२४) इथे पैसे मोजावे लागतात... ४३

२५) वृथा धाक ४५

२६) गत ४६

२७) शाळा ४७

२८) मोडता पाय ४९

२९) तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस... ५१

३०) संकेत ५३

३१) या वात्सल्य वृक्षाखाली ५४

३२) प्रकाशपुंजासाठी ५५

३३) स्वप्नातील स्वप्न ५६

३४) मी गर्भवंत पुरुष ५७

३५) हे त्यांना कसं उमजणार? ५८

३६) नसतं कोण कुणाचं ५९

३७) भविष्याची शपथ ६०

३८) नव्या युगाचे चित्र ६१
३९) हत्ती आणि मुंगी ६२
४०) रस्ते ६६
४१) खूणगाठ ६९
४२) कां? ७२
४३) वारकरी ७३
४४) सरल्या ऋतुचं वास्तव ७६
४५) झाड नि माणूस ७७
४६) एका नामवंत मृत्युच्यानिमित्ताने ८१
४७) जनगणना - १ ८३
४८) जनगणना - २ ८६
४९) एफ. आय. आर. ८९
५०) आरक्षण ९२
५१) अधिष्ठान ९४
५२) नवी दुनिया आकाशपार ९५
५३) तू भेटणारच नसशील तर ९७
५४) गोची १००
५५) जीवनगाणं १०१
५६) जडलेला जीव १०५
५७) माणसं बदलतात १०६
५८) शहाण जगणं ११०

५९) रस्ते होणाऽऽर १११२

६०) स्थित प्रज्ञ! ११६

६१) तत्त्व आणि तिलांजली १२०

६२) मी वाट पाहीन... १२२

६३) नवे जागतिकीकरण १२४

६४) मौन १२७

६५) चमु सांगा कुणाची? १३०

६६) वंचितांचा जिहाद १३२

६७) समर्पणाचं आसूसलेपण १३४

६८) माझी तक्रार १३७

६९) पालथ्या घड्यावर पाणी १३९

७०) नकार तरंग १४१

७१) या जन्मी तरी १४३

७२) कालातीत अभय १४५

७३) उद्याची प्रतिसृष्टी १४८

७४) करुण क्रौर्याची इतिःश्री १५१

७५) नवा शिक्षक १५६

७६) तू एकंदरीत झोपमोडच १५७

७७) तू १५९

# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

माझ्या परसात आंब्याचं झाड आहे. मी काय पाहतो, दरवर्षी आंब्याला ठराविक काळात मोहर येतो. नंतर काही काळाने फांद्या आंब्याने लगडतात. थोड्या वाकुल्या होऊन मला घ्या, मला घ्या म्हणून कलू लागतात. ऐन गुढीपाडव्याला मग पहिल्या कैरीची कैरी डाळ होते. उन्हाळ्यात कैरीचं पन्हं होतं. मग लोणचं. नंतर आमरस. फळ एकच, झाड एकच पण तऱ्हा किती! कवितेचही असंच असतं कवीने कविता लिहिली की तो प्रथम ती कोणत्यातरी वृत्तपत्राच्या रविवार पुरवणीसाठी पाठवतो. कधी साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षण्मासिक, वार्षिक, दिवाळी अंकांना पाठवतो. अशा प्रकाशित ५-५० कविता झाल्या की कवीला काव्यसंग्रहाचे डोहाळे लागतात. पहिलटकरीण जशी मग बाळंतपणासाठी डॉक्टर शोधू लागते, कवी तसा प्रकाशक शोधू लागतो. बाळंतपण झालं की बारसं तसं काव्यसंग्रहाचे शीर्षक, मुखपृष्ठ, सजावट होऊ लागते. काव्यसंग्रह प्रकाशन समारंभ म्हणजे पहिला वाढदिवसचं. तो दरवर्षी येतो तसा वर्षागणिक काव्यसंग्रहाच्या नवनव्या आवृत्या म्हणजे झाडांना येणारा मोहर, बहरचं ना?

आज काल कविता लिहिल्या क्षणी प्रकाशित होते. कवी प्रकाशनासाठी उतावीळ असतो. त्यात नवकवी असेल तर विचारूच नका. वयात आलेल्या तरुणीसारखं या कवीच्या कविता नवयुवतीच्या चंचलतेने नी फुलपाखरांच्या गतीने व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटरवर झळकू

लागतात. शिवाय पुस्तक वेडा, अक्षरधारा, अक्षरनामा, बिगुल, गुडरीड इत्यादी ग्रुप्स, पोर्टल्स्, ई जर्नल वरती प्रकाशित, फॉरवर्ड होत राहतात. कवितांना नि कवीला आता प्रकाशकाची रूढ अर्थाने गरज उरली नाही. शिवाय पुस्तक वाचनाचा संकोच झाल्याच्या काळात कवी नि त्याचा कवितेस You-Tube चॅनल्स, नि स्टोरीटेल अभिवाचन समूहाचं वरदान मिळालं आहे. म्हणून आज कविता स्वप्रकाशी (Self Published) जशी झाली आहे तशी दृतप्रचारी/प्रकाश वेगप्रसारी (Viral) होत त्वरित संसर्गीही झाली आहे. कवीला अथवा कवयित्रीला आता दाढी वाढवणे, झब्बा विजार नी झोळी घेऊन फिरणे, सिगरेट पिणे किंवा जॉर्जेटची साडी घालून गावातील तरुण रस्त्यांवर फेरफटका मारणे, मॉल फेरी, बाग-बाजार फेरीची-शायनिंग फ्लाईंगची गरज उरली नाही. कविता आता 'चट मंगनी, पट शादी' झाली आहे. माध्यमांवर झळकताच लाईक, डिसलाईक्स, कॉमेंट्स, सबस्क्राईब होणं नि' जलते दिलवालेंचे' ट्रोलिंग, टॉंट्स मिळणं, अभिप्राय, रसग्रहण समीक्षा ही द्रुतमार्गी, द्रुतगामी झाली आहे.

पण हा काळ कवितासंग्रहाच्या आवृत्तींवर आवृत्त्या येण्याचा खचितच नाही. आजची तरुण पिढी कविता ऐकते, पाहते अधिक; वाचते कमी. त्यामुळे आज कविता दृकश्राव्य रुपात प्रकाशित, प्रचारीत, प्रसारित होण्यास अधिक महत्व आले आहे. हा काळ कवी संमेलन, मुशायरे, मैफिलींचा नाही. काही प्रकाशक तर केवळ फायदा-तोट्याचा विचार करत पुस्तक प्रकाशित करत असल्याने ते साहित्य प्रसारार्थ प्रकाशन व्यवसाय न करता लक्ष्मी संचयार्थ पुस्तके प्रकाशित करत असल्याने ते सरस्वती-सावित्री सेवक राहिले नाहीत. म्हणूनच ते अज्ञानाने नि काहीशा अडाणीपणाने 'आम्ही काव्यसंग्रह प्रकाशित करत नाही' असा टेंभा मिरवतात. तेव्हा त्यांना हे कळत नाही की, आपण आपली कबर आपल्याच हाताने खोदत आहोत.

अशा काळात माझ्या कवितासंग्रहाचे प्रकाशक, माझे स्नेही नि सन्मित्र अनिल म्हमाने 'सरल्या ऋतुचं वास्तव' ची तिसरी आवृत्ती आणि माझ्या नवरचित कवितांचा नव्या संग्रहाची 'मी या काळात नाही' ची

पहिली आवृत्ती प्रकाशित करतात. यास साहित्यिक व सामाजिक मूल्य आहे. अनिल म्हमाने हे सामाजिक कार्यकर्ते, कुशल संघटक, यशस्वी प्रकाशक आहेतचं पण त्याच्या आधी ते कवी आहेत. त्यांचे तुरुंगातील ‘अस्वस्थ रात्रींच्या कविता’ (२०१२) आणि ‘दंगल आणि पुन्हा तुरुंग’ (२०२०) मध्ये मिळून ७१ हून अधिक कविता आहेत. अनिल म्हमाने ‘अस्वस्थ अश्वत्थामा’ आहेत. त्यांची स्वतःची विचारधारा आहे. ते पुरोगामी आहेत. त्यांच्या आक्रमक, चळवळ्या नि संघटक म्हणून असलेल्या प्रतिमेमुळे त्यांना दहशतवादी, नक्षलवादी ठरविण्याचे कुटील परंतु अयशस्वी प्रयत्न हितसंबंधी स्वार्थाने यापूर्वी झाले असले तरी, ते खचून गेलेले नाहीत. ‘दूध का दूध और पानी का पानी’ कालौघात होत असतेच. काळाचे उत्तर अंतिम सत्य होय. सतत काहीतरी उपक्रम करत ते सांस्कृतिक, साहित्यिकविश्व प्रवाही, प्रभावी राहावं म्हणून प्रयत्नशील असतात. विचार विरोध नि व्यक्ती विरोध या दोन स्वतंत्र गोष्टी होत. विचाराचा मुकाबला विचारानेच केला पाहिजे. व्यक्तीविरोध नेहमीच आकस, स्वार्थ, ईर्षेपोटी होतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. याचे मी माझ्या जीवनात अनेकदा अनुभव घेतले आहेत. त्याच्या झळा नि सोसचा मी साक्षीदार आहे. म्हणूनही त्यांच्याबद्दल माझ्या मनात आस्था व प्रेम आहे. मी त्याचा भागीदार नसलो तो हितैषी जरूर आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी प्रा. डॉ. शोभा चाळके यांचा आज वाढदिवस असताना मी हे मनोगत लिहितो आहे. या योगाने मी त्यांचे मनःपूर्वक अभिष्टचिंतन करतो.

माझ्या या कवितांची ही तिसरी खेप आहे. या माझ्या कवितांचा काळ सन १९६७ ते २०१४ असा सुमारे पन्नास वर्षांचा आहे. या काळातील ७५ हून अधिक कविता यात आहेत. गेली ५० ते अलीकडची सात वर्षे अशा दोन विषम शतकातील या कविता. गेले शतक यंत्रयुग होते. जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञान क्रांतीने वर्तमान २१ वे शतक तंत्रयुग झाले आहे. यंत्र नि तंत्रात फरक आहे. तो फरक उत्पादन पटीचा, श्रम काटकसरीचा नि वेग समाप्त होण्याचा आहे. तंत्रयुगाने काळ, काम, वेगाचे त्रैरासिक बदलले तसे जळी, स्थळी, काष्टीची पूर्व संकल्पना निरस्त केली.

तुम्ही असता तिथं जग तुमच्या मुठीत येतं प्रत्यक्षप्रमाण या तंत्र वरदानाने तुम्ही किती तंत्रस्नेही यावर तुमचं वैश्विक नि विश्वस्नेही असणं अवलंबून आहे. जे तंत्र माध्यमात नाहीत, आंतरजालीय संपर्क ज्यांचा नाही, जे पडद्यावर नाहीत (Laptop, Mobiles, Screens) ते इतिहास जमा अशी स्थिती उत्पन्न झाली आहे. 'गुगल इज ग्लोब', 'विकिपीडिया इज एनसायक्लोपीडिया', 'कनेक्ट इज मॉडर्न अँड फॉर्वर्ड' असे या काळाचे ब्रीद (Tag Line) आहे. 'न जुडला तो संपला' हे या काळाचे वास्तव असल्याने या कविता लवकरच विकिमीडिया कॉमन्स वर प्रकाशित होतील. त्यामुळे जगभरचे वाचक या कविता वाचू शकतील. पुन्हा एकदा निर्मिती प्रकाशनचे माझ्या कवितेला 'इजा, विजा, तिजा' वरदान देऊन पुनरज्जीवीत केल्याबद्दल आभार!

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

दि. ३० सप्टेंबर २०२२

(शोभा दिन)

# दुसऱ्या सुधारित, संवर्धित आवृत्तीच्या निमित्ताने

'सरल्या ऋतुच वास्तव' या माझा पहिला काव्यसंग्रह दीड एक वर्षापूर्वी 'निर्मिती संवाद' च्या अनिल म्हमाने यांनी तो मोठ्या प्रेमाने प्रकाशित केला होता. त्याची दुसरी आवृत्ती, तीपण सुधारित व संवर्धित रुपात वाचकांच्यापुढे सादर करताना मला मोठा आनंद होत आहे. याचे श्रेय प्रकाशकांच्या उत्साहासच द्यावे लागेल.

या काव्यसंग्रहाची पहिली आवृत्ती ९ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रकाशित झाल्यानंतरच्या गेल्या वर्षा-दीड वर्षांच्या काळात मी लिहिलेल्या २० कविता या आवृत्तीत असल्याने ही नुसती सुधारितच नाही तर संवर्धित आवृत्ती आहे. या २० कवितात अधिकांश कविता या सामाजिक स्थितीवर भाष्य करणाऱ्या आहेत. काही एक प्रेम कविता तर एखाद बालकविताही! सामाजिक कवितांत वर्तमानाचे प्रश्न, स्थित्यंतरे, वंचितांचा जिहाद, विकासाच्या नावावर चाललेला भ्रष्टाचार, विध्वंस त्यात आहे तर सरळमार्गी माणसाचं एकटं होणं-त्याचं शल्यही आहे. रोज तत्त्वाला तिलांजली देत जगणाऱ्यांची वाढती संख्या माझ्यातल्या कवीला अस्वस्थ करते. लोकशाहीची जागा ठोकशाही घेत असल्याचं वैषम्य या कवितात प्रतिबिंबित आहे. 'नवे जागतिकीकरण', 'वंचितांच्या जिहाद' कविता तुम्ही मुळातूनच वाचायला हव्यात 'माझी तक्रार' मध्ये माझं समाजमन व्यक्तिगत होण्याचा प्रवास सांगेल. 'कालातीत अभय' या विपरीत स्थितीतही मी जपला, जोपासलेला मूल्यवाद तुम्हास समजावेल

अलिकडच्या काळात समाजसुधारक, समाजसेवक यासारखे शब्द इतिहास जमा होत आहेत. ज्यांना सामाजिक व्यक्तित्त्व मानावं असे विशुद्ध सामाजिक लोक दुरापास्त झालेत. समाजमन असलेली माणसं आपली छोटी छोटी बेटं जीव मुठीत ठेवून वंचित विकासाचे व्रत जपत आहेत. समाजाच्या लेखी त्यांना एन. जी. ओ. ठरवून त्यांच्या समाज मान्यता,

प्रतिष्ठेपुढे संशयाचे प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. समाजकार्य कोणा राजकीय विचारसरणीचा अनुनय करणारं असेल तर त्याला अभय अन्यथा अन्य अमान्य, असा उपेक्षेचा व्यवहार रुढ होतो आहे. समाजकारण राजकारणात बेमालूम घुसवून तेच कसं प्रागतिक, पुरोगामी हे ठसवण्याचा हा उद्योग होय. समाजकारण व राजकारण ही दोन्ही अलग क्षेत्रे असून दोन्ही आवश्यक असली तरी त्यांच्या स्वतःच्या गरजा व मर्यादा भिन्न आहेत हे आपणास विसरून चालणार नाही आणि म्हणून त्यांची गल्लत करता कामा नये. वंचितांचा विकास, त्यांचे विश्व स्वतंत्र व स्वायत्त राहाण्याने जितका लवकर व प्रभावी होईल तितका अनुनय, गल्लत, गफलतीने साधणार नाही.

या काव्यसंग्रहातील प्रेम कविता, बालकविता, 'नवा शिक्षक' सारखी आधारित कविता माझ्यातील कवीच्या शैली वैविध्याचा भाग म्हणून पहा. त्यात व्यक्तिमन आहे, म्हणून त्या व्यक्तिगत, आत्मनिष्ठ माना. आत्मनिष्ठेशिवाय ललित सौंदर्य नाही. समाजशल्य दूर व्हायला व्यक्ती सौंदर्य, आत्मनिष्ठ अभिव्यक्ती फुंकर असते. या कवितांचे महत्त्व तितकेच.

**डॉ. सुनीलकुमार लवटे**
२८ मार्च, २०१४
(आझाद हिंद सेना दिन)

• संपर्क
'निशांकुर', अयोध्या कॉलनी,
राजीव गांधी रिंग रोड,
सुर्वेनगर कॉर्नर, पोस्ट कळंबा,
कोल्हापूर - ४१६००७
• भ्रमणध्वनी - ९८८१२५००९३
• ई-मेल - drsklawate@gmail.com
• वेबसाईट - www.drsunilkumarlawate.in.

# माझी कविता, माझी घडण

'सरल्या ऋतुचं वास्तव' हा माझ्या कवितांचा संमिश्र संग्रह आहे. ही संमिश्रता अनेक अंगांनी पहाता येईल. विषय, आशय, भाषा, भाव अशा अंगांनी ती संमिश्र, तशी प्रकारांनी पण. प्रेमकविता, बालकविता, सामाजिक, राजकीय, व्यंग अशा तिच्या अनेक परी आहेत.

कविता ही गतकालचे वास्तव जशी असते तशी ती भविष्याचा कानोसाही! पण माझी ही कविता गतकालच्या स्मृती जपणारी आहे. या स्मृती कडू, गोड, तशा अस्वस्थ करणाऱ्याही आहेत. यापैकी काही कविता मला सतत रूंजी घालायला लावतात. कारण त्या माझ्या अस्वस्थ जानकी आहेत. माझ्या या कविता मी शिळोप्याच्या उद्योग म्हणून लिहिल्या नाहीत, त्या लिहिल्या गेल्या आहेत. मी मराठी, हिंदी, इंग्रजीतील दर्जेदार कविता, खंडकाव्ये, चरित्र काव्य, महाकाव्ये वाचली असल्याने या कवितांचं खुजेपण मला माहीत आहे. या सामान्य कविता होत. तरीपण त्यांचा नि माझा संबंध जगण्यातून आल्याने त्यांच्याबद्दल माझ्या मनात आस्था आहे नि आपलेपणाही! काही कविता माझे जीवनव्रण घेऊन येतात तर काही जीवनव्रत! त्यामुळे आजवर मीच त्या अनेकवार वाचत आलोय. त्यात  वाचताना माझ्याकडून वेळोवेळी अनेक बदल, सुधारणा झाल्यात.

अगदी पहिली कविता मी केंव्हा लिहिली असं आठवू लागलो तेंव्हा लक्षात आलं की मी इयत्ता ९ वी मध्ये शिकत होतो. तेंव्हा आमच्या आंतरभारती विद्यालयात पाठक सर 'धडपड' नावाची भित्तीपत्रिका प्रकाशित करत. तेव्हा आमच्या शाळेतर्फे १५ ऑक्टोबर, १९६४ रोजी 'अरविंद बालक मंदिर' ची स्थापना करण्यात आली होती. त्या निमित्ताने 'धडपड' भित्तीपत्रिकेचा अंक प्रकाशित होणार होता. त्यात मी 'बालमंदिर' नावाची कविता लिहिली होती.

ती हस्तलिखित भित्तीपत्रिका होती. त्यातील वरील कविता वाचून माझ्या मित्रांनी कौतुक केलं होतं. एका मित्रानी त्याबद्दल गोळी भेट दिल्याचंही आठवतं. ती कविता उपलब्ध नसणं माझ्या दारिद्र्यावर (शब्द नि कल्पनांच्या!) केवढं मोठं पांघरुण!

माझ्या कवितेला खरे धुमारे फुटले ते १९७० मध्ये. मी त्यावेळी श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी, जि. कोल्हापूर येथे डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन) हा बी. ए. बी.एड्. समकक्ष अभ्यासक्रम शिकत होतो. शेवटचे वर्ष होते अन् माझ्या मनातल्या प्रेयसीने नुसता उच्छाद मांडला होता. माझ्या प्रेमाचा लपंडाव सुरु होता. कधी होकार, कधी नकार... जीव नकोसा व्हायचा! रात्रभर झोप नाही, भूक नाही, अभ्यासाकडे लक्ष नाही अन् अभ्यास केल्याशिवाय तर गत्यंतर नसायचे. सारं शिक्षण शिष्यवृत्तीवर सुरु होतं. अशा घालमेलीत जन्मलेल्या सन १९७० दरम्यानच्या कविता म्हणजे विरहकाव्याचा वसंत ऋतुच! (जरी त्यात सर्वत्र ग्रीष्म ऋतु असला तरी!) त्या कविता प्रेमाच्या वसंत ऋतुने जन्मल्या असल्या तरी त्यांना विरहाच्या ग्रीष्म ऋतुचा उपजत शाप होता. आज ४० वर्षानंतर परत मी जेव्हा या कविता वाचतो तेंव्हा त्या अल्लडपणाचं हसूही येतं नि त्या अस्वस्थतेचे शहारे आजही तितकेच मला रोमंचित करतात. संग्रहातील पहिल्या १४ कविता या कालखंडाच्या आहेत.

मग एक फुटकळ कवितांचा काळ आला. नंतर मी काही बालकविताही लिहिल्या. त्या सर्वांना बालिश कविता म्हणणे योग्य ठरावे. बालिश या शब्दाचा दुरान्वयाने एक अर्थ मूर्ख असाही होतो. त्याबद्दल अधिक काही न लिहिणे बरे. चित्रापूर्वीच्या रेघोट्या म्हणून त्यांचं अस्तित्व लक्षात घेऊन त्या या संग्रहात समविष्ट केल्या आहेत. यात काही प्रासंगिक रचनाही आहेत.

सन १९७६ च्या दरम्यान लिहिलेल्या 'आत्मवंचना' सारख्या कवितातून मला माझं खरं रुप दिसू लागलं. जीवन खऱ्या अर्थाने कळू लागले होते. भाबडेपण संपून मी वास्तवाचे धक्के सहन करत होतो. प्रेमात आणि ध्येयवादात सारखंच भाबडंपण असतं, अशी माझी धारणा आहे. दोन्हीतील भ्रमभंगाचे

धक्के माझ्या  मनी निर्माण होऊ लागले, ते 'कथनी व करनी' मधील अंतरानी! 'उज्वल उद्यासाठी' कविताही अशा मन: स्थितीचं अपत्य म्हणून पहात येईल. माझ्या ज्या परिस्थितीतून मी घडत होतो त्यात उपकृततेचं ओझं होतं. ते कधी कधी असह्य व्हायचं. मी अशी काही माणसं दुय्यम, लाचार, मूल्यहीन जीवन जगणारी पहायचो. त्यांची उबग यायची मला. अशांच्या दर्शनातून 'सावधान' कविता स्फुरली. आजूबाजुला हातावरचं पोट असणारी कुटुंब पहायचो. पैशाअभावीचे त्यांचे हाल पाहून 'इथे पैसे मोजावे' लागतात कविता लिहिली गेली.

सन १९७५ – ७७ च्या दरम्यानचा काळ आणिबाणीचा होता. मी माध्यमिक शिक्षक संघटनेत सक्रीय झालो होतो. एम. ए. झालेला मी आता एका मुलाचा बापही झालो होतो. संघटनात्मक कार्यातून माझी राजकीय जडणघडण होत गेली. समाजावादी, गांधीवादी, मार्क्सवादी विचारांशी माझी जवळीक असली तरी कोण्याएका विचाराच्या मी कधी आहारी गेलो नव्हतो... आजही गेलेलो नाही. त्यामुळे आणिबाणीत तिच्या विरोधी जनआंदोलनात सक्रीय होतो. आणिबाणीनंतरचा स्वप्नभंग माझ्या पिढीने जसा अनुभवला तसा त्यानंतर आलेल्या शासनाचाही! इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखालील आणिबाणीपूर्व व आणीबाणीनंतरचाही काळ आम्ही पाहिला. मी पुरोगामी झालो तरी स्वतंत्र होतो. 'तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस' सारखी कविता या काळातील.

सन १९७९ – ८० मध्ये मी पीएच्. डी. झालो. महाविद्यालयात हिंदीचा प्राध्यापक झालो. मोठ्या उमेदीनं उच्च शिक्षणात आलेला शिक्षक मी. इथं मला अनेक दुभंगलेली, दुहेरी व्यक्तिमत्व असलेली माणसं भेटली. अशातून 'संकेत' कविता जन्मली. 'प्रकाशपुंजासाठी' ही याच वेळची.

सन १९८४ ते २०१० हा कालखंड माझ्या जीवनातला मानसिकतेच्या दृष्टीने विचाराल तर विचित्र असा कालखंड म्हणावा लागेल. या स्थितीचं वर्णन 'विमनस्क' असंच करावं लागेल. माझ्या आयुष्यात दुसरा वसंत अकालीच दरवळू लागला. त्यातून 'स्वप्नातील स्वप्न', 'मी गर्भवंत पुरुष', 'नवी दुनिया

आकाश पार', -'तू भेटणारच नसशील तर', 'खूणगाठ' कविता आल्या. त्या वाचल्या की माझ्या विमनस्क स्थितीची तुम्हाला कल्पना येईल. बहुधा तुम्हीपण हा दुसरा वसंत अनुभवला असेल. माणूस चिरतरुण असतो, हे सिद्‌ध करणाऱ्या या कविता. या भरात (आणि बहरात) मी एक लावणीही लिहिली. पण ती चावट वाटल्याने या संग्रहात घालण्याचं धाडस झालं नाही. तशा या कविताही काही कमी चावट नाहीत, याची मला कल्पना आहे. सन २००४ च्या नंतर मी काही दीर्घ कविताही लिहिल्या. 'खूणगाठ', 'वारकरी', 'झाड आणि माणूस', 'जनगणना', 'एफ. आय. आर', 'आरक्षण' या त्या कविता होत. या कवितातून तुम्हाला मी दिसेन. आजचा मी.

कविता माणसाच्या वयाबरोबर विषय आशय, भाषा यांची वळणं घेत विचारी होत रहाते. त्याचं प्रत्यंतर हा कविता संग्रह देईल. माझ्या कवितेबद्दलचे हे दोन शब्द तिच्या निर्मितीची पार्श्वभूमी समजावी म्हणून लिहिले आहेत. कवितेच्या पृष्ठभूमीबद्दल लिहिलं तरी प्रत्यक्ष कवितेबद्दल मी शब्द काढलेला नाही. कविता हा 'स्वान्त:सुखाय' रियाज जसा असतो तसा 'स्वान्तदु: खाय' चाही असतो, अशी माझी समजूत आहे, अनुभव आहे. ती कविता आज मी प्रगट रूपात तुमच्यासाठी सादर करीत आहे.

'निर्मिती संवाद' चे माझे मित्र अनिल म्हमाने यांनी त्या प्रकाशन करायचे ठरवून मला ऋणी केलं आहे. हल्ली प्रकाशक कविता प्रकाशित करणे म्हणजे तोटा सहन करणे मानत असताना त्यांनी हे प्रकाशन करावे यात माझ्या कवितेच्या श्रेष्ठत्वापेक्षा मजवरचे प्रेम मोठे असणे हेच खरे कारण होय. मी त्यांचा आभारी आहे.

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

९ ऑगस्ट, २०१२

(क्रांतीदिन)

## अखेरचा अश्रू

जीवन कल्पास
फळे लागता इच्छेची,
तव प्रभात होते
स्वर्णसुखी, मदमत्त जीवनाची.

जीवन यौवन
असे कशी बावन्न,
स्वर्णधुरी स्वप्नांचे जसे बिलोरी कोंदण.

यौवनाच्या या धुंद वादळी
परागित होते मधु - मीलन पुष्पकळी,
अन्
यौवन - पळस फुलतो पंचपानी.

शृंगार मधुरता, मदिरेची मस्त धुंदी,
निखळते उल्का जशी
आकाशी कधी - कधी.

जीवन रजनीनाथा
ग्रहण निराशेचे,
लोपते साम्राज्य
स्वर्णधुरी स्वप्नांचे.

पाहता स्वप्नभंग
या चंदेरी दुनियेचा,
दाटतो नयनी
अश्रू अखेरचा.
**१९६७**

## अशी अचानक

अशी अचानक थबकलीस कां?
मला पाहुनि लाजलीस कां?
झाली दृष्टिभेट,
तुझ्या - माझ्या नेत्रांची
आतुरलेल्या कितीतरी अनमिक भावनांची.

अर्थ तुला या क्षणिक भेटीचा
खरोखरीच उमगला नव्हता कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

तुझ्या खळीचे हास्य बरसते
मला पाहता विरत असे,
हास्य विलोपनाचे गुपित तुजला
खरोखरीच उमजले नव्हते कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

कां खेळ मांडिलास?
होकार - नकारांच्या पाठलागांचा,
मूल्य तुला दीर्घ मीलनाचे
खरोखरीच समजले नव्हते कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

प्रिती मजवरी नसताना
कां वृथा देखावा मृगजळाचा?
औट घटकेचा प्रेमी मजला
खरोखरीच बनवायचा नव्हता नां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?
१९६७

## लयलूट

जीवन अंबरी
पथ कंठाया अंधारी,
तुज साथ हवी मज
एकाकी जीवनी.

विदित असू दे,
मम जीवन बेकारी
निश्चय नि स्वभाव हवा
तुझा करारी.

निस्सिम प्रेमाची तृषा
तृप्त होण्या दाखव मम
तुझी भावना - दिशा.

तव भाव - नौका
मम प्रेमा विहारी,
लयलूट करी ही
जीवन अंधारी.
**१९६७**

**छबी**

देह नसता सामोरी
मनी छबी अमर आहे,
त्या रूपगर्वितेची स्मृति
खोल अंतरी सलते आहे.

भान हरपते,
मी हरवतो,
निरखता तिचे सारे रूप - लावण्य
ती रुप की सौंदर्य ती?
आभासाने या
दृढ मन ही चाळवते.

सुशीलता, रेखीवता, सोज्वळता नि विनम्रता,
सर्वगुणसंपन्न प्रतिमा
मनी हुबेहुब अजुनि आहे.

पण
चक्षुपटावरील प्रतिमा
धूसरते आहे...
मानस पटलावर मात्र
त्या धूसर प्रतिमेची
छबी दृढ आहे.
**१९६८**

**न सुटणारे गणित**

माझ्या आशेस,
ग्रहण तुझ्या निराशेचे,
खग्रास की खंडग्रास?
उमजेना कधीचे.

प्रेमास माझ्या
जोड तुझ्या नकाराची,
सदैव की क्षणिक
कळेना कधीची.

जीवनास माझ्या
ग्रहण दारिद्र्याचे,
सुटेल केंव्हा
समजेना केव्हाचे.

जीवनाचे हे गणित
सोडवूनही सुटत नाही,
रीत या गणिताची
कळूनही वळत नाही.
**१९६८**

**स्वप्नमाला**

बंध मुक्त प्रेम केले,
केला मी हाच गुन्हा
प्रेमभंग होईल अशी
धूसरशीही कल्पना
नव्हती या भाबड्या मना.

विरह, विरक्ति, मोहपाश - मुक्ती,
नि पळवादी युक्ती, व्यवहारी कूटनीतिही
अघात हे घोर सारे.

अशक्त हृदयी, विचारी मना
विकार ज्वाला नाना,
स्फुल्लिंगांनी फुलविले
हटवादी मनास
नि
पहाता - पहाता खाक झाल्या
बिलोरी स्वप्नमाला.
**१९६८**

## बोळवण

एकदा तू अशीच आलीस
अत्यन्त अकल्पितपणे,
म्हणालीस,
‘आय लव्ह यू!’
अजाणतेपणी मी म्हणालो,
‘सेम टू यू!’

तू नि मी
आकर्षिलो एकमेकाकडे
चुंबकीय ध्रुवांप्रमाणे.
नाटक, सिनेमा, चहा नि रसपान
साऱ्यांचे झाले रसग्रहण
निद्राभंग होता ध्यानी आली
स्वप्नांची बोळवण.
**१९६९**

## कृतार्थता

तू नाही कधी जाणलीस
दुर्दम्य अंतरीची आशा,
तृषार्त जाणून
दाविलीस अंधुकशी दिशा.

रंगरंगोटी वरवरची
फुका देखावा दृढ प्रितीचा
ठाव न घेऊ दिलास तू
खोल-खोल अंतरीचा.

छंद व्यर्थ जडविलास
साखर पेरूनि जिव्हेवरी
अन्
कापलास गळा केसाने
घाव घालुनि जिव्हारी.

सल खोल मर्मान्तरी...

सर्वस्व उधळुनि
कंगाल जरी झालो असलो,
कृतार्थ मनि होऊनि
स्वस्थ आहे विसावलो.
**१९६९**

**जेंव्हा मी प्रेम करतो**

असेच एकदा प्रेम करतो
सर्वस्वाला हरवून बसतो,
नि घेऊन कुंचला चित्र रेखाटतो...

'जीवनाचे पोर्ट्रेट'
कुणी म्हणतो
'मॉडर्न आर्ट'
मी मात्र झिजवतो
'मॉडेल हार्ट'

क्षिती न कुणा या विचित्र कथेची
संकोचते मन,
व्यथा होता कथेची.

विरहाने होतो
अंगाचा तिळपापड
अन् गालावर बसते
न मारत एक थप्पड!
**१९६९**

## प्रयोजन

प्रेमाशी करुनि वैर
विरह मी वागवित गेलो,
अव्हेरुनि आनंद सारा
दुःख मी वेचित गेलो.

तुझ्या प्रेमाची रीतच
झुलवावे सर्वांना,
अपवाद बनण्याची गती नव्हती
याही पामराला.

फुका सर्वस्वाचे दान करुनि
भणंग बनलो दुनियेचा,
सरते शेवटी मीच ठरलो
कांदा अकलेचा.

मृगाक्षीचे हृदय होते,
कौंतेयाची होती वृत्ती,
हे सारे असले तरी,
योग्य प्रयोजनाची मती नव्हती.
**१९६९**

**मन: स्मृती**

ती एकदा येते अवखळ
मनी होते भीषण खळबळ
मन: स्मृती ही अशी बिलंदर
करुनि टाकते मना धुरंदर.

अनोखे स्वप्न, अनोखी स्मृती,
लोपते सदसद्विवेक मती.

वेडावल्या मनी भासांचे काहूर
अशाश्वत जीवनाची निरंतर हुरहूर.

अशातच हरवून बसतात,
साऱ्या जीवनाचे ताल नि सूर.
१९७०

## प्रमेय

स्वप्न साफल्याची मनीषा होती,
नैराश्याने जी लोपली.
आज त्या निराशित मनीषेचा
लवलेश नसला जरी,
शीण मनी अजुनि आहे.
खंत त्या निराशेची
मनी अद्याप दृढ आहे.

लाभ नाही, लोभ नाही,
प्रेम-प्रमेय अटळ आहे.
अन् या अगृहित प्रमेयात,
नाश माझा अटळ आहे.
१९७०

**तुझ्या सहवासात...**

तुझ्या सहवासात,
मृत्तिकेसही गंध फुलांचा येतो.

तुझ्या बोलण्याने
मोत्यांचे  रुप शब्दा येते.

तुझ्या नेत्रकटाक्षानं गं,
उष्मा बर्फात येतो.

तुझ्या हसण्याने,
धुंदी मदिरेची येते.

तुझ्या स्पर्शाने गं,
जीव पाषाणातही येतो.

तुझ्या सहवासात,
मी माझे मीपण गमावतो.
**१९७१**

**वल्गाना**

अभंग प्रेम,
झाले भंग.
विचार अखंडित,
झाले खंडित.

अतूट प्रिती,
छिन्नविभिन्न झाली,
विचारी स्वप्नांची
ताटातूट झाली.

आधाशी वासना
आशा नि आकांक्षा
उपेक्षेने साऱ्या
उपाशीच राहिल्या.

अखंड सोबतीच्या
अगणित घोषणा,
अखेर ठरल्या
व्यर्थ वल्गना.
**१९७१**

## मातीविना शेती

उगवू माती विना मोती
मिळवू पाल्यातून ही पाचू
विस्तारु पाण्यावरी पर्णवेली
दावू मरूभूमीतही रत्ने
करिता दीर्घान्तरी प्रयत्ने।
**१९७३**

## तृषार्त

'तृषार्त'
एक वाटसरु
धूसर पथावरचा
लख्ख प्रकाशाच्या शोधात
चाचपडत धडपडतो आहे.

जीवन झटापट
प्रयत्नांची पराकाष्ठा
सफलतेचे तारू
शोधतो आहे.

नीति नाही इतकी कठोर की
तृषार्ताची तृष्णा–नौका
तृप्तीचा किनारा
न गाठू शकेल.
१९७४

## आत्मवंचना

माणूस जगतो आहे आज
माणसातील माणूस विस्मरुन
कालचा विसर पडतो आज
उद्याच्या स्वप्नांबरी विचरताना

कालची वेदना आज तशीच असते
उद्याच्या व्यथेवर फुंकरण्या.
चिन्तन तेच असते
अनुभव उद्याचा न्यारा.
फापट पसरलेल्या विश्वाचा
भरोसा करणे आत्मवंचना असते.

म्हणूनच की काय?
कोकिळा कावळ्यावर विसंबून
बिनधोक, बेभानपणे,
क्षितिज स्पर्शिणाऱ्या घनघोर वृक्षराजीत
आजला कालचे स्मरण देत
कुहू ऽ कुहू ऽ करीत असते.
**१९७६**

## कुत्रा

एक होता कुत्रा,
त्याचे नाव मोती.

खात असे रोटी,
शेपूट त्याची छोटी.

दात असे सुळे,
भरधाव तो पळे.

रंग त्याचा काळा,
पट्टा असे गळा.

पाय त्याचे चार,
नखे धारदार.

जीभ त्याची लांब,
कान किती छान!

जो नाही भित्रा,
त्याचे नाव कुत्रा.
**१९७६**

## बगळा

बगळा
आगळा वेगळा
जळातील जणू डोमकावळा.

ठावे त्याज पुरेपूर
कसा काढावा
आवळा देऊनि कोहळा.

शुभ्र, स्वच्छ
धुतल्या तांदळा जैसा
जणू ब्राह्मण सोवळा!
**१९७८**

## उज्वल उद्यासाठी

करु नका रे, करु नका
रामराम जुलमाचा करु नका ।।धृ।।

अध्यापक असा की प्राध्यापक
क्षेत्रे आपुली मुक्त करा
'सा विद्या या विमुक्तये'
न पेक्षा शिकवू नका ।।१।।

शिकवेल त्याची शाळा
पिकवेल त्याचा माळा
असा समाजवाद येईल केव्हा
प्रतीक्षा त्याची करु नका ।।२।।

कचेरी, गिरणी, कारखाने
ठिकाणे असोत कोणतीही
प्रश्न सुटायचे असतील तर
संघटनांस पर्याय नाही,
धाकधपटशास बळी पडू नका ।।३।।

स्वराज्यात स्वतंत्र बना
बना स्वप्रज्ञ, स्वभिमानी,
उज्वल उदयासाठी
भ्रष्ट बांडगुळे पोसू नका ।।४।।
**१९७७**

## सावधान

भाडोत्री सभागृहातील भाड्याच्याच खुर्चीवर
नरभक्षकाच्या वळचणीत लपलेला
एक भाडा मला म्हणाला
या शबनममध्ये असते काय?
विनोबा, जयप्रकाश, अतिरथी-महारथी
गळी घालतात बॅगा अशा.

त्या बिचाऱ्या ठावे काय?
युगच हे सामान्यांचे
असामान्य इथे पडतात थिटे.

या शबनममध्ये असतात
लक्तरे नागव्यांची
जात्याच जे दिगम्बर
लक्तरलज्जेची महत्ता त्यास ठावे काय?

भाडखाऊ साला!
उन्मत्तांचें तळवे चाटत
पददलिता झाडीत लाथा
त्यातच त्यास वाटे
आपला उन्नत माथा.

त्या बिचाऱ्या ठावे काय
उगवणारा प्रत्येक सूर्य,
चंद्रोदयात मावळत असतो.
आजचा चंद्रच
सूर्य उद्याचा होत असतो.
अंगी ल्यालेला कृष्णकोट

अर्धांगिनी संगे मिरवण्या
त्या बिचाऱ्या ठावे काय?
काळा डगला लेऊन
तो गोरे असल्याचा बहाणा असतो करत.

हे काळे डगलेवाले
असतात सर्वच क्षेत्री
शाळा, गिरणी आणि कचेरीतही.

एवढ्यात झाले
'शुभमंगल सावधान'
मनी म्हणालो
या सुंभ अमंगळांपासून सावधान!
१९७७

**अशी शाळा**

अशी शाळा कुणी पहिली कां?
पाहिली असेल तर सांगाल कां? ।।धृ।।

भिती नाही माराची
कटकट नाही अभ्यासाची
अशी शाळा कुणी पाहिली कां? ।।१।।

पाठांतराविना कविता शिकविणारी
गणिते पाढ्याशिवाय येणारी
अशी शाळा कुणी पाहिली कां? ।।२।।

गणवेशाची नाही किरकिर
नाही रोज उठून 'फी'ची पिरपिर
अशी शाळा कुणी पाहिली कां ।।३।।

परीक्षेविना पास करणारी
घरी राहिलो तरी हजेरी भरणारी
अशी शाळा कुणी पाहिली कां ।।४।।

गुरुजी नाही डोळे वटारणारे
नाही शिपाई धाक देणारे
अशी शाळा कुणी पाहिली कां ।।५।।

पाहिली असेल तर सांगाल कां?
तिथे प्रवेश मला देणार कां?
**१९७८**

**मी तुझा राजा गं**

मी तुझा राजा गं,
तूच माझी राणी
गाठ तुझी – माझी
सात जन्माची ।।धृ।।

देईन तुला शालू भरजरी
गं वेलबुटी पदरी
होशिल कां अप्सरा या इंद्राची गं
सात जन्माची ।।१।।

चल जाऊ दूर
वाजवू नगं खूर
चटक दावीन इश्काची गं
सात जन्माची ।।२।।

सोड सखे रुसवा
गं मदन तुझा फसवा
शपथ तुला प्रेमाची
सात जन्माची ।।३।।

आज जाऊ नगं सोडून
जीव असा तोडून, साथ हवी मैनची गं,
सात जन्माची ।।४।।
**१९७८**

**इथे पैसे मोजावे लागतात...**

असे काय घेऊन बसलात
तत्त्वजंजाळ फुका उरी,
काडीमोल आहे काय जगात?
साऱ्यासाठीच इथे पैसे मोजावे लागतात ।।१।।

जगायचे जरी सुखाने म्हटले
लावावी लागते लांबलचक रांग,
वृथा कुणा मारु नये अशात हाक
वितभर खळगी भरायची तरी
इथे पैसे मोजावे लागतात ।।२।।

स्नेहबंध जीवाभावाचे जपायचे तर
मानापमाने संकेत पाळावे लागतात,
पान घेण्याची ऐपत नसली तरी
मानासाठी इथे पैसे मोजावे लागतात ।।३।।

टेबलावरचा कागद उडू नये म्हणून
मर्जी चपराशीची सांभाळावी लागते,
पांढऱ्यावर काळे नखभर करायचे म्हटले
कचेरीत चार पैसे सोडावे लागतात ।।४।।

जिवंत असून दाखल्यासाठी
न मेल्याची हजेरी लावावी लागते,
उतार वयातही चार पैशासाठी
दहा पैसे मोजावे लागतात ।।५।।

कटकटीतून विरंगुळा म्हणून
नदी - बागी जावे वाटते,
भेळ - भडंग, पाणी - पुरी,
उरी सारे कसे खावे वाटते.
साधा वेळ काढायचा म्हटले तरी
इथे पैसे मोजावे लागतात ।।६।।

नाही काही स्वस्त म्हणून
मस्त मरुन चालत नाही
अंत्येष्टीच्या काष्ठासाठीही
इथे पैसे मोजावे लागतात ।।७।।
**१९७८**

**वृथा धाक**

माणसा!
धाक वृथा दाखवू नको,
पिंड नाही जो आपला
धींड त्याची काढू नको,
धाक वृथा दाखवू नको ।।धृ।।

अतर्मनी जे रुचतचि नाही,
रीऽ तयाचि ओढू नको,
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।।१।।

करायचे ते करीत रहा
चिन्ता वृथा वाहू नको,
करणे जे अशक्य
मनी चिन्ता त्याची नको
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।। २।।

पटेल ते सांगत रहा
तमा कुणाची बाळगू नको,
शिकेल तोच टिकेल
फुका उपदेश करु नको
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।।३।।
१९७८

## गत

आकाश स्पर्शाची मनीषा असावी,
ताड - माडा गत.

स्वैर स्वये झोकण्याची ईर्ष्या असावी,
सागरलहरी गत.

विचारांवर अटळ श्रद्धा असावी,
अढळ ध्रुवागत.

परहित झिजण्याची असावी वृत्ती,
वहाणागत.

असावी जिद्द प्रतिकूलतेवर मात करण्याची,
निवडुंगागत.

क्षणोक्षणी सोस असावा ज्ञानग्रहणाचा,
मधमाशीगत.

असावे समायोजन सदैव तत्पर,
लव्हाळागत.

मनोधारणा असावी प्रज्वलित,
अग्नीगत.

निष्पाप ठेवूनि मन जगी रहावे,
मुलागत.

सतोद्योगी स्वभाव असावा,
मुंगीगत.
**१९७८**

## शाळा

घंटा घणघणली,
मुले जमली,
प्रार्थनेचा हुकूम झाला,
बागडणाऱ्या चुमुकल्यांचा,
थवा क्षणात स्तब्ध झाला.

कापऱ्या स्वरात राष्ट्रगीत,
वर्गात जाती ओळी भीत.
गुरुजी आले उभे ठाकले,
शत्रूसैन्य सज्ज जाहले.

नमस्ते म्हणाले एक साथ,
कुणाचे वरती-खाली हात.
ओळख परेड, हजेरी, छडी
पळता भुई झाली थोडी.
पाटी दफ्तर, गणवेश तत्पर,
सरबत्ती प्रश्नांची झडू लागली.
घाबरी पोरं घामेघूम,
मनी वाटे ठोकावी धूम.

मराठी, हिंदी, पार्शी, इंग्रजी
आट्यापाट्यांनी सूर धरला
गणित, विज्ञान नि भूगोलाचा
लपंडाव रंगून गेला.

स्काऊट, कार्यानुभव, चित्रकला
कळा नाना, रंगे फळा

नेहमीच्याच यशस्वी कलाकारांचा
प्रयोग एकपात्री सुरु झाला.

सावधान - विश्राम, पीछे मूड
नसतो कुणाचा कशात मुड
देह देवळात चित्त खेटरात
सारे लक्ष चहाघरात.

होता घंटा बांधून पट्टा
पोरांपुढे गुरुजी धावती
बस चुकेल पळा रे पळाऽऽ
पोरांनो! उरलेला फळा तेवढा पुसून टाका.
शाळा आपली भरेल आता
उद्या सकाळी आकरा वाजता.
१९७८

## मोडता पाय

मोडता पाय हरघडी, हरकामी
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?

उभारणाऱ्या मोडू नये
उमलणाऱ्या खुडू नये
विदित हे असून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?

तू सूज्ञ, ज्ञानी तू,
व्यवहार मात्र सदैव मानी
दूधात खडा मीठाचा घालू नये,
नाउमेद कुणा करु नये.
जाणत हे असून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?

बोलणे तुझे थुंकलेले चाटणे,
स्वविष्ठचेच भक्षण करणे.
शिकूनही अडाणी
असंस्कृत नि माणसातून बहिष्कृत
हे सारे अनुभवून पदोपदी
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?

असून धडधाकट, तरण्याबांड कोकरागत,
अपंग म्हणून घेतोस कां?
वाचस्खलनाने मूक बिचारा बनतोस कां?
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?

माशी शुभकार्या शिंकू नये,
आडवे मांजर दौडू नये,
संकेत हे कळून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस कां?
१९७८

**तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस...**

आता चर्चा ही नको त्या काळ्याकाभिन्न रात्रीची.

तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस
म्हणून दिवे मी केंव्हाच मालवले होते
डोळ्या-डोक्याची जळजळ थांबावी म्हणून,
लख्ख प्रकाशाची प्रतीक्षा होती.

ते सर्व नीतीवाले भोगंळ ठरले तेंव्हा
वाटले होते तू तरी सूर्य आणशील
हो! पसापसाभर एकटाकी मतं म्हणून तरी दिली होती
आता तरी टाकीचे घाव नको म्हणून
देवपणाची अपेक्षा होती.

पण खरं सांगू का!
नको होतं देवपण
फक्त हवी होती भाकरी आणि स्वातंत्र्य
नव्हते सोयरसुतक कुणा 'गेटा' शी
(न वॉटर, न तुर्कमान)
खरं तर मिनी मोटरही नको होती
(मारुती)
जन्मत: निराधार असलेल्या मजसारख्यांना
योजना निराधार निघाल्याचंही वैषम्य नव्हतं!
(संजय)

फक्त वाटत होतं
विधवेच्या विटाळानी शंकराचार्याला
तीन - तीन वेळा न्हावं लागलं नसतं.
नि भरधाव लोकलमध्ये

वस्त्रहरणाचे खुले नि मोफत प्रयोग झाले नसते.
वाटलं होतं,
अमंलदाराच्या चावडीत अंधत्व येणार नाही
(गवई बंधु)
जामदारखान्याच्या किल्ल्या चोरांच्या कनवटी लटकणार नाही.
कमीत कमी अपंग वर्षात तरी
अधुत्व येईल अस वाटलं नव्हतं
फुलनदेवीच्या मस्तकाचा लिलाव
महामस्तकाभिषेकाच्या सुमुहूर्तावर
होईल असं वाटलं नव्हतं

नि म्हणून
तू आणणाऱ्या सूर्यासाठी
मी उष: कालालाही अव्हेरल होतं
केवळ तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस म्हणून...
**१९८१**

## संकेत

या जगाचे काही संकेत आहेत,
ते जपायचे असतात.

संकेताचेच राज्य हे,
इथं गाढवं मरतात ओझ्यानं
नि शेंगरु येरझाऱ्यानं.
टिकोजीराव औट घटके
फोन कानाशी लावून
धन्याची लाळ चाटत असतात
संकेत पाळण्यासाठी.

इथे येतो तो जातो,
निसर्ग नियम म्हणून.
तरी पर्मनंट असल्याच्या भ्रमात
तंबीचे गुद्दे नि मेमोचे फटकारे
तो देत असतो केवळ संकेत म्हणून.

प्रसिद्धीला हपापलेले
काही न करता माशा मारत
नाव यावं नि व्हावं म्हणून,
जीवाची धडपड करत असतात
बूड स्थिर रहावं म्हणून.
**१९८३**

## वात्सल्य वृक्षाखाली

या वात्सल्य वृक्षाखाली,
होऊ दे, अनाथ सनाथ सारे
परिवर्तनाचे हे वारे
पेटवू देत धुमारे जगी सारे ।।१।।

अनाथ, निराधार, अनौरस सारी
उकिरड्यावरची लेकरे ही
उंबरठ्यावरी येऊ द्या
या वात्सल्य वृक्षाखाली
सनाथ त्यांना होऊ द्या ।।२।।
**१९८३**

## प्रकाशपुंजासाठी

प्रकाशपुत्रांना प्रकाशाची गरजच काय?
ते ठिणग्यांची भिक मागत नसतात कधी
राखेच्या ढिगाऱ्यांना.

कोळसे उगाळून का कधी शलाका जन्मल्यात?
आग जन्मायची तर
आत आग असावी लागते.

शेकोटी म्हणजे दावनल नव्हे,
वडवानल तर नव्हेच नव्हे,
आगीशी सोयरसुतक नसणाऱ्यांना
इंगळ काय नि राख काय?

जळते ती आग म्हणणारे नंदीबैल
विस्तव पदरात घेत नसतात
राखेच्या स्पर्श मात्राने थरारणारे हात
प्रकाशपुत्रांना सलाम करण्याचे धाडस करत नसतात.

प्रकाशपुंजांचे वावडे असणारे शरीर,
मानसिक मुडदुसाने गलितगात्र असते,
राखेच्या ढिगाऱ्यागत.
पाण्याच्या हपक्यापूर्वीच
मनाचा धसका त्यांनी घेतलेला असतो
प्रकाशपुंजासाठी.

**१९८४**

## स्वप्नातील स्वप्न

झोपेत आज अचानक
स्वप्न अनोखे पडले
अजाणतेपणी उरी घट्ट बिलगले.

झोपेतचि कुशीत तिच्या
एक स्वप्न आणखी आले कसे
मला न कळे!

हलकेच गोंजारत
मी मला विसरलो.

ते स्वप्न की सत्य?
सजीव झाले पुढे कधी, कसे
ते आजही नाही समजले.
१९८४

**मी गर्भवंत पुरूष**

मी गर्भवंत पुरुष!
लाख-लाख लख्ख गर्भ
मीच माझ्या उदरी जन्म दिलेले
कधीही जन्मा न घालण्यासाठी ।।१।।

अनीति, अनाचार, अत्याचार
नि दुराचाराचेपण
लाख - लाख लख्ख गर्भ ।।२।।

ती स्त्री गर्भवती!
उदरीच काय पण मनीही
एकुलता एक गर्भ
तो पण जन्म देण्यासाठी
जपते कां ।।३।।

स्त्री असते ती!
स्त्रियांनी गर्भ जपायचे नसतात
मी गर्भवंत पुरुष जीवंत असेपर्यन्त ।।४।।
**१९८४**

## हे त्यांना कसे उमजणार!

नाकर्तेच ते,
नामुष्की आपुली लपवायची म्हणून
दरवाजा लोटायचा वेंधळेपणा नेहमीच करत आलेत ते.
पण
जगाला दार लागत नसतं
नि कुलुप ही,
हे त्यांना कसे उमजणार? ।।१।।

बशा बैल होऊन
रवंथ करणे सोपे असते
चोथा चघळून रस तर सोडाच
लाळ तीही थेंबभर
टपकत नसते
हे त्यांना कसे उमजणार ।।२।।

कावळ्यांच्या शाळेतून
एखाद्यास वाळीत टाकणे सोपे असते.
डोकी मोजणाऱ्या लोकशाहीत,
बिनडोकांची सरशी नेहमीच होते.
कावळ्यास बहिष्कृत केल्याच्या भ्रमाने,
कोंबड्याचे आरवणे थांबत नसते.
सूर्यास दडवणे सोपे का असते?
हे त्यांना कसे उमजणार? ।।२।।
१९८५

**नसतं कोण कुणाचं,**

नसतं कोण कुणाचं
हे जितकं खरं,
तितकच जग असतं सर्वांचं!

जिव्हारी ज्वाळांच्या
अग्निदिव्यातूनही
उमलत असतात फुलं
कधी कर्ण होऊन
तर कधी शकुंतला.

इथं असतात विश्वमित्र, दुष्यंत
नि दुर्वास ही,
सोसून सारा दुस्वास
फुलविणारे नवे रान!
**१९९४**

## भविष्याची शपथ

जन्मत: जे असतात
वंचित, उपेक्षित नि शापितही
उत्सवांच्या मांडवांखालून
त्यांनी जायचं नसतं!
गावकुसाबाहेरील वस्तीगत
हेटाळणीच त्यांनी कुरवाळायची असते!

आतषबाजी, मेजवानी, शोभायात्रेचा
हक्क त्यांना कुणी दिला?
चार भिंती नि गजाआड
हाताची घडी व तोंडावर बोट ठेवत
सोनेरी बालपण त्यांनी गमवायचं असतं!

वंचित असल्याचा शाप भोगत
अहिल्येची हेटाळणी
त्यांनी सहन करायची असते!
उज्वल भविष्याची शपथ म्हणून!!
१९९५

## नव्या युगाचे चित्र

या रे या, सारे या
शाळेस नव्या जाऊ या ।।धृ।।

इनसॅटस्, सॅटेलाइटस्,
चॅनल्स, इंटरनेट
रिमोट युगाचा दाबू या ।।१।।

कंपास जाऊ दे
कॉम्प्युटर येऊ दे
गणित कॅलक्युलेटरने करु या ।।२।।

नको घोकमपट्टी,
नको गृहपाठ,
स्क्रीनवरच प्रॉब्लेम्स सोडवू या ।।३।।

नको पाटी, नको पुस्तके
दफ्तराचे ओझे पाठी नको,
खुशाल सीडी खिशात घेऊन
नव्या शतकात जाऊ या ।।४।।

पेन्सिल, रबर, रंग नि पेपर
कसलीच नको खाडाखोड
माऊस अलगद फिरवू या
चित्र नव्या युगाचे काढू या ।।५।।
**१९९९**

**हत्ती आणि मुंगीची गोष्ट**

काही दिवसांपूर्वीची गोष्ट.

ते घोळक्यानी यायचे,
माणसं नि गाड्या आडवायचे,
दमात घेऊन वर्गणी उकळायचे.

आपण ती निमूटपणे द्यायचो,
ब्र नाही काढायचो.
विचारायचोही नाही,
कशाची म्हणून,
कधी हिशोबही नाही विचारला.

आणखी काही दिवसानंतरची गोष्ट.

त्या वसूल करणाऱ्या फाळकूट दादांचे
चौका-चौकात बोर्ड झळकू लागले.
लार्जर दॅन लाईफ....

ग्रुप कॉर्नर-कॉर्नरवर जमू लागले
सहली, पार्ट्या रोजच्याच
कधी - कधी दमऽमारोऽदऽऽमही!

मरु दे तिकडे
आपल्याला काय त्याचं म्हणून
आपण चक्क तोंड फिरवायचो.

थोड्या दिवसांपूर्वीची गोष्ट.

कॉर्नरच्या ग्रुप्सनी गल्लीत
प्रवेश केला अन्
चौका - चौकात नंग्या तलवारी
तळपू लागल्या.
लाठ्या-काठ्या, चेन्स, स्टिक्स, स्टंप्स,
साऱ्यांचा खच पडू लागला.
डोकी त्यांचीच फुटायची
म्हणून आपण त्यात ना डोकं घातलं
ना डोकावलं, ना नाक खुपसलं.

काल - परवाचीच गोष्ट.

त्यापैकी एकानं
माझ्या मित्राचं अपहरण केलं
चक्क खंडणी मागितली
एकुलता एक म्हणून
बापानं गुमाऽन देऊन टाकली.

कालचीच गोष्ट.

त्यांनी खुद्द पोलीस चौकीतच
हैदोस घातला...
अण्णा.. दादांची फोनाफोनी झाली,
फौज निमूट सुटून आली.

मटण, बिर्याणीचे हंडे पोहोचू लागले
पोलीस अन् गुंड मिळून
सहभोजन करु लागले.

हद्दपार, तडीपार, मटकेवाले
पोलीसांच्याच टू व्हिलरवर
सर्रास फिरुही लागले
तरीही आपण
आळी-मिळी गूप चिळी
मला काय त्याचं
म्हणून पुन्हा निमूटच.

आणि मग आज.

त्यांची मस्ती, मग्रुरी इतकी वाढलीय...
घर, दुकाने, गाळे गिळत
ते चक्क माझ्याच घरी दाखल.

बऱ्या बोलानं सांगेल ते ऐकलं तर बरं
नाही तर माझ्याशी गाठ आहे म्हणाले.
ऐकलं नाही तर
बघून घेतोही म्हटले
मी मान डोलवत गप्पच.

मग ते रोजच घरी येऊन धमकावू लागले...

म्हाताऱ्याचा गळा घोटीन
तरण्या - ताठ्या पोरीला डोळा लावीन
हात - पाय कलम करीन
बायकोचं कुंकू पुसीन
एक ना दोन
रोज नव्या धमक्या
तरी मी गप्पच.

पुढे निनावी फोन
खोट्या - नाट्या तक्रारी
अश्लिल क्लिपिंगजही मोबाइल्सवर.
अन् घाण - घाण एस्‌एमएस्‌सुद्‌धा!
आता मात्र माझा संयम संपला... सुटला.

मी विचार करु लागलो.
मार्ग शोधू लागलो.
अन् लक्षात आलं
ते पाचच आहेत
पण संघटित.
आपण एकशे पाच
तरी असंघटित.

एक दिवस हिय्या केला.
बळ एकवटून जाब विचारला
तसे ते हबकले.
गोष्ट आठवली...
मुंगी हत्तीच्या कानात शिरली.
तसा हत्ती गारद झाला.

केल्याने होत आहे रे,
आधी केलेचि पाहिजे.

महात्मा गांधी आठवले...
'अत्याचार करणाऱ्यापेक्षा
तो सहन करणारा अपराधी.'
**१९९९**

## रस्ते

रस्ते,
शेती, वस्तीकडे जाणारे पायवाटेचे
दूर मामाच्या गावी नेणारे गाडीचे
धुरांच्या रेषा हवेत काढणारे
नि काळवंडलेले महानगरीही!

रस्ते,
खडीचे, मुरुमाचे
खाचखळग्यांचे
काँक्रीट, डांबरी
आणि आता पळणारे रबरीही!

रस्ते,
ओढणारे
घुटमळणारे
रुखरुखणारे
व तुटलेले ही!

रस्ते,
कुशीत घेऊन गोंजारणारे
ऊनातही ऊब देणारे
कधी वेशीवर टांगणारे
उध्वस्त धर्मशाळेचेही!

रस्ते,
हिरवाईने नटलेले वनराईचे
फळा - फुलांनी डवरलेले
वृक्ष - वेलींनी झाकलेले, सुकलेले

ऊन - सावली खेळणारेही!

रस्ते,
दिव्यांनी लखलखणारे नेकलेस
मखमली शेल्यांनी सळसळणारे
चंदेरी, सोनेरी अन् सुगंधी
मिठाई वर्खानी झळाळणारेही!

रस्ते,
अरुंद गल्ली - बोळातले
मध्यवस्तीत सुवर्ण - चतुर्भुजी
जवळचे, लांबचे, खुश्कीचे
आणिक अंधार - आडोशाचेही!

रस्ते,
चढणारे, उताराचे,
डोंगर - दऱ्यातून वळसे घेणारे
शिखरावरुन जमीनीवरील तारांगण दाखवणारे
जमीनीवर आणणारेही!

रस्ते,
ओळखीचे, पायाखालचे,
वाट चुकलेले
पत्ता शोधत हरवलेले
आणि अचानक सापडलेलेही!

रस्ते,
चटके देणारे
चमक, चुणूक दाखवणारे
चटका लावणारे

चकवणारेही!

रस्ते,
नाकासमोर जाणारे सरळ
बुद्धिबळातील ऊंटांचे तिरके
सापशिडीचे गिळणारे, घसरवणारे
खिंडीत गाठणारेही!

रस्ते,
धूसर धुक्यातले
निरभ्र आकाशातले
तिमिरातून तेजाकडे नेणारे
चांदणे शिंपडलेलेही!

रस्ते,
मुलांनी बागडणारे
तारुण्यानी ओसंडलेले
हळूच हातात हात घेणारे
वृद्‌ध प्राजक्ताच्या लांब सावल्यांचेही!

रस्ते,
मनातले, हृदयातले, गळ्यातले
रोखणारे, 'नेती' 'नेती' गुणगुणणारे,
अंतर्मनात दिवस - नि - दिवस पिंगा घालणारे
'डेड एंड' असलेलेही रस्तेच!
२००४

## खूणगाठ

तो बहर ओसरल्यावर
आज पुन्हा यावा - यावासा कां वाटतो?
वाहून गेलेला नदीचा पूर
उरी पुन:पुन्हा दाटत रहातो.

माझ्या अंगणात पडलाय आज
पानगळीचा पिवळा जर्द सडा
मनी मात्र सरलेल्या
आयुष्याचा तोच झिंग आणणारा पिंगा.

याचं मोठं आश्चर्य वाटतं
वसंत सरण्यापूर्वी पुरता
हा हट्टी ग्रीष्म आलाच कसा?
अजून शरदाचा खरा रंग
उठलाय तरी कुठे?

सरीत चिंब भिजण्याआधीच
श्रावणसरी ग सरल्या कशा?
हिरव्या गालीच्याचा अजून नाही पत्ता
कारळ, मोहरीच्या फुलांना
असा लख्ख बहर कां यावा?

हेमंती फला - फळांच्या बागा, ते ताटवे,
पायाखाली येण्यापूर्वी तुडवले कसे नि कोणी?
अजून घन - गर्भगंधी झुळूक ही नाही,
ताटवे तट - तट तुटले तरी कसे?

जाई, जुई, मोगरा, बकूळ
व्याकूळ होण्यापूर्वी निर्गंध कां व्हावेत?
खरंच होता कां गंध कधी
मग तो गेला तरी कुठे नि कसा?
आता ही तगमग केवळ असह्य!
एकदा त्यांना विचारायलाच हवं.

न टाकलेल्या त्या प्रेमपत्रांनी
आज अचानक कां फडफडावं?
कदाचित तिच्या आजी झाल्याची कुणकुण
त्यांना लागली असावी.
हा बहुधा तिच्या ऋतु सरण्याचा
पत्रांना झालेला साक्षात्कार असावा.

आपण तसं कधी देवा - ब्राह्मणाच्या साक्षीने
सात फेरे काढले नव्हते,
मंगळसूत्र, कुंकू, चुड्याचा उपचार
आपणाला कधी अनिवार्य वाटला नव्हता नां?

आठवतं तुला?
मग एकदा हळूच आपण
साऱ्यांचे डोळे चुकवून
अंगठी कशी घातली होती ते.
अन् हो, चांगलं आठवतं मला...
तू हट्टानं माझ्याकडून घालून घेतली होतीस !
परवा नातवाच्या बरशात ती तू मोडली तेव्हा
काय कालवाकालव झाली होती तुझी म्हणून सांगू?

पूर्वी गवत, गोवऱ्या दिसल्या की
तुझ्या सहवासातील गुलाबी थंडी

कुडकुडायची.
आज सरण आठवतं नि स्मशान!

केसांचं रंगान्तर
माझं वेशांतर नि स्थित्यंतरंही अनेक!
हेच कां ग असतं आयुष्याचं भाषांतर?

आठवतं? मी फोन करायचो पूर्वी तेंव्हा
'हे' आहेत म्हणून तू अलगद कट करायची
नि आज पूर ओसरल्यावर
किती सफाईने मिस कॉल देतेस!

अन् परवा मंडईत
तुझ्या कळत्या मुला - मुलींसह अचानक भेटलो
तू 'काका' म्हणून ओळख करुन दिली
तीही किती सहज!
मुलांनी ताडलं तरी
तुझा तो बनाव खासच उजवा होता.

आता कशाला हे सारे..
असं वाटलं तरी
ते मखमली झरे वाहतातच
तिकडे क्षितिजावर अजून
मिळून दूर-दूर उडण्याची हूरहूर
या एकसष्ठीतही
त्या सोळा वर्षांच्या दिवसांचीच
खूणगाठ असते.
२००६

## कां?

पान सर्वत्र हिरवी कां?
आकाश सारं निळं कां?
समुद्र कुठंही अथांगच कां?
नदी नेहमी वाकडीच कां?
पर्वत सर्वत्र ऊंचच कां?
वारा हमेशा वाहतोच कां?
प्राणी मुळातच मुक्त कां?
सूर्य सदा उग्र कां?
चांदणे सर्वदा शीतल कां?
फुलं जळी - स्थळी रंगीत कां?
पक्षी क्षणोक्षणी गातात संगीत कां?
ऋतु नित्य नवे कां?
पांढरे, काळे ढग हरघडी निराळेच कां?
माती मऊ, मुरमाड देशी तशी विदेशी कां?
माणूस मात्र सर्वव्यापी, अगम्य, आगळा कां?
२००८

## वारकरी

वारकरी
वार करी
कधी नोहे.

वारकरी
टाळकरी
माळकरी
काळठरी
कधी नोहे.

वारकरी
व्रतकरी
यात्राकरी
मात्राकरी
कधी नोहे.

वारकरी
भक्ती संप्रदाय
आसक्ती संप्रदाय
कधी नोहे.

तुका झालसे कळस
भजन करा सावकाश
किळस अवकाश
कधी नोहे.

वारी म्हणजे येरझाऱ्या
साऱ्या अमंगळाच्या शिसाऱ्या
हिंसेला थारा,
कधी नोहे.

तुका, नामदेव,
ज्ञानोबा माऊली
क्षमेची सावली
गेली कोठे?

गाथा तरंगली,
कारण तो संतसूर्य होता
तुझा अंतःसूर्य
मग कां वरपांगी?

पंढरी, आळंदी,
देहू, वाखरी
विवेकाची वैखरी
विखारी कधी नोहे.

अणुरेणुया थोकडा
तुका आकाशाएवढा
मग गड्या तुझ्या गळी
क्षमेला का आवंढा?

वाल्याचा जिथे वाल्मिकी होतो
तिथे पाय घसरल्याची काय पत्रास
पदर पसरला तरी स्थितप्रज्ञ
गोष्ट अक्षम्य असते एखादी
माझीया मना
आकळे ना.

तुका म्हणे तोचि संत
सोशी जगाचे आघात
आनंद डोही!

फडकरी नव्हे गडकरी
लोकसखा माथ्यावरी
समाजचरणी विनम्र
जीव सत्शील!

पुंडलीक वरदा हाऽरीविठ्ठल
नाठाळाच्या माथी डंठल
श्री ज्ञानदेव, तुकाराम
कठोर नवे सुतराम.
पंढरीनाथ महाराऽज की जऽय
क्षमा सदैव अजय.
नाचू कीतर्नाचे रंगी
अहंकाराचा अशं नसे अंगी
ज्ञानदीप लावू जगी
सत्संग बाणवू समग्र अंगी.
२००९

## सरल्या ऋतुचं वास्तव

जेंव्हा ऋतु हिरवा बरवा होता
वहातही होता वाह्यात
तेंव्हा तुझं रुसणं, फुगणं
होतं लटकं.

आता ऋतु सरल्यावर
तुझं असं मागं लागणं
वराती मागून घोडं नाही कां?

प्रत्येक गोष्टींचा आपापला ऋतु असतो खरा.
गोष्टी ज्या त्या वेळीच घडलेल्या बऱ्या
नि शोभतातही! असतातही बऱ्यापैकी खऱ्या.
आता असा लाडिकचाळा
फोनवर फुका गळा
हा लटका फार्स नव्हे कां?

झालं गेलं पुरं झालं
तुझं पावित्र्य नि पातिव्रत्य
तुला लकलाभ!
अन् माझं सत्यवानपण मला.

प्रेम काही शिळोप्याचा नाही खेळ,
तो असतो हृदयाचा मेळ.
ते असतं समर्पण,
सरपण पुढं गेलं तरी
सरता नाही सरत,
ते असतं उत्सर्जन नि विसर्जन!
‘स्व’ नि ‘स्वत्वा’चं
अर्जन - परिमार्जन ते नसतंच मुळी.
२००९

## झाड नि माणूस

पूर्वी झाडं कशी डेरेदार असायची.
घट्ट मुळं रुतलेली,
अन् सुदुर पसरलेली.
झाडं तोडू म्हटलं तरी नाही तुटायची.
कुणी तोडू लागलं तर
जमीनीला हुंदका याचचा.
सोट मूळ इतकं खोल असायचं
कोयता, कुऱ्हाडीचं पातं बोथट व्हायचं
पण मूळ मात्र अतूट.

आता अशी झाडं राहिलीत तरी कुठं?
एकतर ती इतकी
वर्षोन्वर्ष वाढू दिली जात नाहीत.
जगतात, वाढतात तोवर
रस्ते रुंद होऊ पाहतात
झाडे पसरण्यापूर्वीच
पसार होतात.

फुलं, फळं पूर्वी तपानं यायची
आता तर ती, हाताच्या बोटांच्या वर्षावर
शिवाय हाती येणारी
टी. डी. संकरित (Tall and Dwarf)
ताड, ताठ, नाही
कणा पण.
फुलं घमघमत नाहीत
कवठी चाफ्यागत.
गंधच नाही
तर दरवळणार कशी?

फळं बिन बियांची
अन् चव
अम्मळ बेचवच.
त्यापेक्षा फवाऱ्याची उग्रता वरचढ
धुतली तर
हातांचीच लाही.

माणसंही तशीच
सारी हॅपी बर्थ डे पुरती
सामोसा गरम असेपर्यंत
नि आईस्क्रिम विरघळे तोवर.

येतात ढग भर - भरुन
यावेत तसे
पण बरसतात कमीच,
भुंकतात मात्र अधिक.
हात भरुन आणतात,
अन् खिसे रिकामे करुन जातात.

चर्चा काय ग्लोबल
झोपतात डबल बेडवर
सिंगल होऊन
तोंडं परस्पराविरुद्ध
तरी बरं
दारं लागलेली असतात.
मोबाईल सर्वांचे सुरु
जगभर संवाद तरी
घरी मात्र अळी - मिळी - गूप - चिळी.
हा पिसारा
की पसारा?

विकास की
विध्वंस हा?

सारे एकत्र
तरी एकटे
यु. पी. ए काय
अन् एन. डी. ए. काय
डी. एन. ए. कुणाचा नाही हाती
एंजोग्राफ साऱ्यांचे पुसट
निदान होत नाही म्हणून
एंजोप्लास्टी.

आताशा मी बिया खोवायच्याच
सोडलय...
पूर्वी छंद होता घननिळा
वर्षभर साठवायचो, वाळवायचो
पेरायचो अन् चक्क पाणीही घालायचो.

मग नर्सरी आली
अन् नर्सऱ्या ही गल्ली - बोळातून,
कॉलनी, उपनगरातून.
रोप नर्सरीतलं...
बाळ अनाथाश्रमातलं.

ॲडॉप्शन, इमिटेशन
सारा झटपट बाजार
न्यायला वेळ कुणाला?
आवराआवरीची धांदल
शाई वाळायची नाही उसंत
चक्क काटकोनी कोपऱ्याकडे

‘मी’ नि ‘माझं’
आत्ममग्न, आत्मरत समधिस्थ जीवन.

झाड पाऊणशे वर्षाचं असलं तरी
हृदय पुनर्रोपण होणारं असावं
घरी परस नसला तरी
वृद्धाश्रम, प्ले स्कूल असलेच पाहिजे.

परस्परपूरक
परस्परविरुद्ध
सारं एकाच वेळी हवं.

मला समाधान आहे,
‘मी’ असल्याचं.
ग्लोबल कम लोकल.
२००९

## एका नामवंत मृत्युच्यानिमित्ताने

त्या नामवंत मृत्युची
ती शोकवार्ता
क्षणार्धात सोसाट्यानं
येऊन थडकत होती...

एस. एम. एस,
इंटरनेट,
प्रिंटमिडिया,
चॅनल्स,
नि कर्णोपकर्णीही!

एक नामवंत निवर्तले तेंव्हा
शोकाची किंचितही छटा
कुणाच्या चेहऱ्यावर नव्हती.

वृत्तपत्रांच्या श्रद्धांजलीत
चॅनल्सच्या बाइटस्‌मध्ये
इंटरनेटच्या ब्लॉगवर
अग्रलेखात नि वृत्तविशेषमध्येही!

तिचा सारा पसारा
म्हणजे शब्दकळा होती
गळा भरुन होता हुंदका
मला तरी ऐकूच नाही आला कुठे
नि अश्रूंचा अनावर पाझरही दिसला नाही कुठे.

मी मोबाइल स्वीच ऑफ करुन
सुन्न मनानी

त्या कविता, ते लघुनिबंध,
अनुवाद नि समीक्षा वाचत राहिलो.
अन् कळालं की
ग्रंथालयातून ही पुस्तकं
अपवाद वाचकांनी
अपघातानेच नेली होती.

नाही म्हणायला
चार-दोन अधोरेखितं भेटली त्यातही
तीच खरी त्या नामवंत मृत्युची
मृत्युंजयी दाद होती...
बाकी सारा तो दिवस साजरा करायचा
उत्सव होता!

नामवंत मृत्युची शोकवार्ता
रकाने भरण्याची एक रिकामी जागा असते...
चॅनल्सच्या वार्तापत्रातील एक ठळक मथळा असते...
नेटवर ट्विस्टरचा एक चाळा असते...

गळा भरुन आलेला हुंदका जेंव्हा कुणा ऐकू येईल
तेंव्हा समजा
तो खरा नामवंत मृत्यू होता
अन्यथा तो एक केवळ नाशवंत होता म्हणून समजा!
२०१०

**जनगणना – १**

सांगा, सांगा, सांगा
तुमची खरी गरीबी श्रीमंती
शपथपूर्वक सांगा.

घरी किती गाड्या, स्कुटर्स
मोबाईल्स, टी. व्ही, संगणक
की वडापनं जाता,
लालडब्यातून फिरता
की करता पायपीट
स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवानंतरही?

हेही सांगा
खातं कुठंय?
स्वीस बँकेत की
पतसंस्थेत (बुडणाऱ्या!)

वाइच हे बी कळू द्या
जगताय कशावर?
रोजावर की एफडीवर?
की फंडावर पदरच्याच?
की आहात टॅक्स – फ्री एन. आर. आय.?
तिथं टिकोजीराव, इथं मात्र बाजीराव?
मस्तानी तिथं बी मी हितं बी!!
असं तर नाय?

घर स्वत: चं की
इंदिराचं रो की स्वतंत्र? की कुडाचं?
वीज, नळ, गटर हाय?

की ओढ्यावरच सर्व?
त्या निर्मलग्राम नि जलस्वराज्यचं
काय झालं? तेबी सांगा.

पोरं साळत जातायत
की कामावर?
खाता, पिता काय?
पिझ्झा की पिठलं?
काढा की कोकाकोला?
ब्रेड की भाकरी?
की उपाशी, भूकबळी?

हेही कळू द्या...
पूर दुष्काळ निधीस पैसे देता?
की गणपतीची वर्गणी भरता?
पदरचा चहा देता कुणास कधी?

अनाथ, निराधार, अनौरस, बी. पी. एल
वेश्या, कुष्ठरोगी, देवदासी,
शेतमजूर, भूमीहीन, धरणग्रस्त
मोलकरीण, बिगारी
यांना का नाही आरक्षण?
कुणी कधी विचार केलाय?
केलाय कधी कुणी त्यांच्यासाठी संप?
काढलाय मोर्चा यांना पाचवा दर्जा नको म्हणून?
कां रोज उठून नवा वेतन आयोग?
आता हे संपलच पाहिजे...
कायम स्वत: च्या पोळीवर तूप ओढणं
नि रोज पिझ्झा, पुरणपोळीची मनोरथं रचणं.
हवंय नवं माणूसकीचं जग,

जात, धर्म, पंथ, स्त्री – पुरुष आरक्षण मुक्त!
हवंय खरं मानवधिकारांच राज्य,
विकासाची सावली खऱ्या गरजवंतातवर धरणारं!

माहितीच्या अधिकाराखाली
कुणीतरी खरी माहिती देईल कां?
भारतातले खरे दलित, वंचित, उपेक्षित कोण?

नवी जनगणना आजच सुरु झालीय...
भारताच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती
त्यांनी भरलेली माहिती
नि एका बीपीएलची पण...
मला हवी आहे...
'खरा माणूस कसा असतो' ते पहाण्यासाठी.
२०१०

## जनगणना – २

**नाव?**
४१
आँ?
अहो मी अनाथाश्रम, रिमांड होमवाला नां?
तिथं माणूस नसतो
एक नंबर असतो पूरा नंबर
मैलाचा असतो तसा
नि कैद्याचाही.

**वडील?**
विश्वामित्र होते
तेही जन्मापूर्वी भूमिगत झालेले.

**आई?**
कुंती होती...
तिनं मला नदी आटली म्हणून की काय
वाळवंटात टाकलं होतं
वाळत, सडत, कुजत.
स्वत:मात्र झाली संभावित
कदाचित सौभाग्य सावित्रीही!

**जात?**
मनुष्य.
तीच बरी नि खरीही!
कशाला हवीत लेबलं?
उच्चनीचतेची,
अन् आप – पर भेद रुजवणारी.
जातीचे गंड नि अहंकार घेऊन

रांगणारे
बरेच मी पाहिले, साहिले
त्यापरास पक्षी बरे
रंग मिळून रहाणारे.

**धर्म?**
माणूसकी.
हिंदू नको...
मनुचा विटाळ उगी.
मुसलमान नको.....
शिया - मुन्नी वाद-विकोप.
ख्रिश्चनही नको..
कशाला हवेत कॅथॉलिक, प्रोटेस्टंट
रोज नव - नवे उगी स्टंट!
नको जैन, बौद्ध नि पारशी
सारे बिचारे माझ्याचसारखे बेवारशी
कधी सरशी, कधी तोंडघशी.

**जन्मतारीख?**
एक्स-रे मशिननी ठरवलेली
तिही दहाव्या वर्षी
ॲफिडेव्हिट झिंदाबाद!
मॅटर्निटी होम मुर्दाबाद!!

**जीवन?**
उत्तम निवृत्त
तरी निरंतर प्रवृत्त!
नाकावर टिच्चून आहे
प्रतिष्ठित नि थोडा सन्मानितही!
आताशा 'त्या' साऱ्यांना सर्टिफाय करतोय...

हे तेच ते
मला अनाथ, अनौरस करणारे नि ठरवणारेही तेच
एक नंबरचे बेभरोसे
उच्चकुलोत्पन्न
सुसंस्कृत
सभ्य म्हणे
माणूसकी शून्य.
२०१०

**एफ. आय. आर.**

होय,
त्यांनी सामूहिक बलात्कार केला तेंव्हा
मी होते गलितगात्र नि हतबद्धही!

पोलीस ठाण्यात
एफ. आय. आर. दाखल करायला गेले तेंव्हा
काँस्टेबल स्टेबल होऊन विचारतो कसा
आय विटनेस काय?
मी म्हटलं
तुझी आय, दुसरं काय?

आता माय नव्हती अन मावशीही
बापुही गाव सोडून गेले होते
काळं तोंड दावायला नको
अन् दिसायलाही!

आता मी होते आधारगृहाची लाभार्थी
बलात्कारित, बदफैली, नासकौडी.
फळून पळालेले निमानिराळे दुष्यन्त
होते समाजसेवक अन् समाजभूषणही!
उगवते नेतृत्व फुलत होते...
अशाच जुन्या समर्थ साथींनी.

मला होती काळ कोठडी
त्यांना मुक्तदार, पाटलाचा माळ.
मी वनवासी,
त्यानां रोज नवा सहवास.

'वाह रे न्याय'
अबलांना न धुणारा कलंक
त्यांना मात्र बोनाफाईड निष्कलंक.

आताशा मी
पुरुष पोसू लागले हाय..
वळू पोसतात तसे.
पंटर मी म्हणतील त्याचा
सँडवीच करतात अन्
किडनॅपही!
आता भले भले
माझ्या बोटावर नाचतात
इसारा द्या... घसारा घ्या.
आताशा तो कॉस्टेबलही येतो
काहीसा अनस्टेबल होऊन
थ्री स्टारवालं सायब घेऊन.

आताशा वडील बी येते झालेत
वाइच वंगाळ घेऊन गेले
माय बी आली
पोरी असं करु नगं म्हटली.

आता तुम्हीच सांगा
असं वागू नको
तर कसं?
कोण पाठ लावणार हाय कां?
बँक बॅक करणार कां?
कां सरकार?
त्याचंच घोडं पेंड खातं
त्ये मला काय देणार?

विनाअनुदान शासन
अनुदार खरं
पर त्येला बी आता
आधारगृहातच डांबायला हवं
त्या परास नवा वर्ग नाही.
नवा स्वर्गही नाहीच नाही.
२०१०

## आरक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
माफ करा
अन् क्षमाही!

तुम्ही घटना लिहिली तेंव्हा
गावकुसाबाहेरच्या वस्ती पलिकडेही
एक वस्ती होती
परिघाबाहेरचा एक परीघ होता.
अनाथ, अनौरस, वेश्या, कुष्ठपीडित,
परित्यक्ता, कुमारीमाता नि देवदासी
अन् वृदध, क्षयग्रस्तही
होते तिथे रहात.

त्यांच्याकडे लक्ष कदाचित गेलं असतं तर
त्यानांही मिळालं असतं आरक्षण
तुम्ही दिलत फक्त संरक्षण.

आता हेच पहाना
रोज जो तो उठतो
आरक्षण मागतो...

ज्याला खरंच हवय आरक्षण
त्याचं मात्र रोज वस्त्रहरण!

मराठे, ब्राह्मण अन् चित्पावनांनाही हवंय आरक्षण
पळा पळा कोण पुढे पळतो पाहू!
अहो डॉ. आंबेडकर,
बी. सी., एस. टी., व्ही. जे. एन. टी

साऱ्यांचा उत्कर्ष झाला म्हणून की काय
ओबीसी सरसावताहेत बाही
ते कमी म्हणूनच की काय
शड्डू ठोकती झाली बाई.

३३% की ४९% की ५१%
लोकसंख्येपेक्षा आरक्षणच ज्यास्त
कशाला पाहिजे हा नुसता वितंडवाद?

परिघाबाहेरच जग परसात घ्या,
परसातलं ऊन अंगणात आणा.
सोपा – चौसोपा हवाच कशाला
उघडा कवाडे विकासाची सताड
जात, धर्म , वंश, प्रांत भाषेपलिकडची.

खुशाल वाहू दे वारा
ज्याला गरज त्यावर धारा

डॉ. आंबेडकर
परत एकदा या
सामाजिक न्यायाची नवी घटना लिहा
जमलं तर इथला प्रत्येक जीव
'माणूस' कसा होईल तेवढं मात्र बघा.
२०१०

## अधिष्ठान

जिवंतपणीच इतक्या आरत्या
झाल्या ओवाळून,
आता आरती उठवायचीही
नाही गरज राहिली तशी.

पुरस्कार, शाबासकी म्हणाल तर भरपूर!
हार, प्रहारही तितकेच!

जग चांगल्याचं,
तसंच करंट्याचंही,
पण तुम्हाला सांगतो
चांगलेच वरकड!

उद्योगही अनेक
लोक त्याला नसती उठाठेव
म्हणत असले तरी
माझ्या लेखी ते
एक एक वीट रचणेच होते.

आयुष्य नाही वाया गेलं
जे गेलं त्यात
धन्य मी... कृतार्थ मी.

मुद्रा नसली माझी,
वा संस्था, मठ, प्रतिष्ठान.
माझं जगणं,
हेच माझं अधिष्ठान.
२०११

## नवी दुनिया अवकाश पार

किती खावा भाव
त्याला काही ठाव
सोड सजनी नखरा.

किती - किती भेटायचं
कुठं - कुठं लपायचं
आता नाही उसंत
गळी आला वसंत.

कशी मानी तू राणी
किती हट्टी गं साजणी
सोड खोटा नकार
दे एकादाचा होकार

एकाच गालावर
तीळ आणि खळीही
बघून बसते दातखिळी
मारायची केंव्हा बुडी?

तू छत्तीस नखरेवाली
मी चौंसष्ठ कलांचा उपासक,
तरी प्रेम आपलं न्यारं
भले जग म्हणू दे उफराटं.

जग म्हणू दे काही बाही
आपण गाऊ जीवन गाणी
आपल्याच प्रेम - प्रांगणी.

तू नाही शिष्या
की मी गुरु
आपण प्रेमरक्षक
नवे संसारी.

प्रेम आपलं न्यारं
जग भ्याड नि भित्रं
आपण दोघे मित्र
नव्या विश्वाचे.

घेऊ नवा श्वास
देऊ न्यारा ध्यास
प्रेम संसार
ही एकच आस.

उभारु नवं जग
नवं रुप, नवं धोरण.
नवी मूल्ये, नवे विचार,
नवी दुनिया अवकाश पार.
२०११

**तू भेटणारच नसशील तर...**

तू भेटणारच नसशील
तर बोलून काय उपयोग?

जग निघालं ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ कडे
अन् आपण थांबायचं ‘फोन इन रिलेशन’ पर्यंत

आतल्या आवाजावत नैतिक नसतं दुसरं काही
संस्कार, परंपरा असतात धोंड धाडसी जगण्यातील.

प्रेम नि आदराचं व्दंव्द
खरं तर भय नि धाडसाचं असतं भांडण.

आत्मबलासारखं बळच
महाबळ असतं मुळी.

माणसं सारे सारीपाट मांडतात
स्वार्थाचे पिंड रचून
तूतरी निरपेक्ष असशील असं वाटलं होतं.

आज मला खरं अंतर उमगलं
स्वप्न नि वास्तवातलं.

गुड डे, स्वीट ड्रीम
सारे असतात शब्द फुगे,
आपणचं आपली फसवणूक करण्यासाठी
सोडलेले कवेत न येणाऱ्या आकाशात
आपला अवकाश भरण्यासाठी.
आपण दुसऱ्याचं आकाश

नाही ना आक्रमत
एकदा कधी तरी ठरवायलाच हवं.

शिक्षण, वाचन, संशोधन
साऱ्या असतात शिड्या,
वरकड पैसा वसुलण्याच्या.
त्यांचा खरा वरचढ अर्थ
आपणास उमगणार तरी केंव्हा?

वाहून गेलेली ओंजळ
भरत नसते कधी
वाया गेलेलं वय
पश्चातापानं नसतं भरत.

आपले विचार, व्यवहारसापेक्ष किती
संदर्भ बदलले की ते बदलतात दिशा
आणि दशाही!

आपणाला खरं जगता येत नाही
म्हणून तर आपण कुबड्या वागवतो.
कधी पातिव्रत्याच्या, कधी प्रतारणेच्या
मनासारखं जगणं जगणं असतं.

मारुन मन जगणं म्हणजे
असतं मरणं!
आता पुरे हे द्वंद्व,
नाही बळ पेलायचं
मनचं आकाश,
त्यांनी आत्महत्या करणं चांगलं.
अन् स्वत: स गाडून घेणं.

आत्मवंचनेसारखी फसवणूक नाही.
खोटं जगण्यासारखी नाही शिक्षा दुसरी.
कुस बदलत रात्र घालवण्यापेक्षा
मनाची मूस बदलणं सोपं.
पण त्यासाठी लागतं
विवेकावर जगण्याचं शिक्षण
अन् शहाणपणही!
२०११

**गोची**

आज माझ्यातल्या पशुनं
उच्छाद मांडलाय कसा.

कळतं पण वळत नाही
काय करायचं याचं?

या कोड्यानं मला
निर्लज्ज बनवलंय निर्लज्ज!

कोण असतो मोठा!
पशु की माणूस?

पशु श्रेष्ठ
तो मरत नाही,
अन माणूस म्हणून
जगता येत नाही.

माणूस एक गोची आहे खरी!
२०११

**जीवनगाणं**

प्रेम म्हणजे केवळ शरीर
हे अज्ञानच एकप्रकारचं.
प्रेम त्या पलिकडची,
एक मनस्वी अस्वस्थता असते खरी!

शरीरापलिकडलं मैत्र असू शकतं
नि तेही पातिव्रत्या इतकंच
श्रेष्ठ असू शकतं

मैत्र असतं इंटलेक्च्युअल फ्रेंडशीप
नि सोशल कंपॅनियनशीपही!
संकुचित, एकारलेल्या
अन् वीट आलेल्या नात्याची
ती सहज प्रतिक्रिया,
नि सकारात्मक प्रतिसादही असतो तो!

पण त्यासाठी आवश्यक असतं
शहाणपण नि आत्मशोधाची अनिवार ओढही.
मांडलेला संसार न विसकटता,
नि क्षणा - कणाची प्रतारणा न करता,
मैत्र निभावता येतं,
त्यासाठी लागतो संयम नि समजही!

मैत्रीचं गारुड उमजायचं तर
यावं लागतं कवच फोडून बाहेर
नि कोशमुक्त व्हावं लागलं अंत:प्रेरणेने.
उभे - आडवे, उलटे - सुलटे,
सरळ - वाकडेही,

धागे सोडवावे लागतात अलगद
स्वहस्ते हस्तक्षेपाशिवाय.

ते सोपं नसतं गुणगुणण्याइतकं
गुंता असतो नात्यांचा
नि फेर असतो
स्वत: च दिलेल्या हातांचा
अन् हाती घेतलेल्या नव्या नात्यांचाही.

तो सुटू शकतो,
आलेल्या अनुभवांनीच
आणि ठेचा, खाचा, खोचांनीही!
त्यासाठी हवं असतं फक्त साहस
स्वप्रज्ञ निर्णयाचं
नि एक पाऊल पुढं टाकण्याचं!

अजाणते टाकलेल्या सप्तपदीपेक्षा
हे पाऊल असतं ठोस,
कारण ते अंतर्मनाचं
गीत, संगीत असतं,
नि नव्या वादळाचं भारुडही!

आपण शिकतो खरे
पण शिक्षित होतो की सुशिक्षित
ते काळच ठरवत असतो.
आलेल्या अपेक्षाभंगातून
नि वास्तवाच्या भानातूनही.
ते अपसूक उमगत रहाते.

अंतर्मनाचा कौल
नैतिकता, पवित्र्य, पातिव्रत्य
एक नैसर्गिक न्याय!
मन नावची गोष्ट ती खरी
बाकी सारं असतं कुभांड
मन – ब्रह्मच असतं अंतिम सत्य!

मन गहाण ठेऊन जगणं
लोडणं घेऊन फिरणं असतं,
रांधा वाडा, उष्टी काढा
हेच का जीवन असतं?

सौंदर्य, समज, लाघव
सारं असून गुलाम जगणं,
स्वविसर्जन असतं,
निग्रहानं केलेली हाराकेरीही!

स्टीव जॉब्जला गवसलेलं ॲपल
आत्मशोधातलं रत्न होतं.
ते न्यूटनचं सफरचंद
नि आइन्स्टाइनची सापेक्षता ती
विज्ञानात असते खरी
पण ॲडाम अन् इव्हचं सफरचंदच
सृष्टीचं चरम सौंदर्य असतं
नि अंतिम सत्यही!

अंतर्मन, अंत: ऊर्जा,
उत्स्फूर्त विवेकाचा कारंजा असतो.
अनुभवांच्या लक्ष्य किरणांचं इंद्रधनुष्य
असतं नव्या क्षितिजाचा अपसूक लागलेला शोध.

तिथंच असतो मैत्रीचा पैस.
आणि मोकळेपणाचा स्पेसही!

जगणं म्हणजे मनस्वी गाणं
आकांक्षापुढती आकाश ठेंगणं होणं
मनासारखं जग नि जगणं लाभणं
म्हणजेच असतं जीवनगाणं
२०११

## जडलेला जीव

जडलेला जीव आता तोडू नको ।।धृ।।
हवं तर राणी
भेटू नको, दिसू नको
जडलेला जीव आता मोडू नको ।।१।।

तू म्हणशील ती अट
मी ठेवणार नाही फट
धरलेला नाद आता सोडू नको ।।२।।

तुझा हसरा मुरका
माझा जगण्याचा गुटखा
गिळलेला अवंढा आता ओकू नको ।।३।।

फ्रेंडशीप बँड घातलास कां?
दिलेली पत्रं वाचलीस कां
घेतलेल्या भेटी आता तशाच ठेवू नको ।।४।।

प्रेम नि आदराचं द्वंद्व किती?
अ‍ॅडाम - इव्हची घालमेल किती?
गुंतलेलं हृदय आता नाकारु नको ।।५।।

आत्मस्वर तोच नैतिक
बाकी सारं पारंपारिक
अंतरीचा कौल ठोकरु नको ।।६।।

नको शरीर, नको स्पर्श
मिठी अलिंगनही देऊ नको
दिलेलं मन माघारी मात्र मागू नको ।।७।।
२०११

**माणसं बदलतात...**

माणसं
इथून तिथं गेली की
बदलतात
सरड्याच्या रंगासारखी.

इथं ते समाजशील
सर्वग्राही होते खरे
वागतं, बोलत, लिहीतही होते बरे.

तिथे गेले ते
अम्मल वरच्याच खुर्चीवर
त्यांना स्पप्नातही कधी वाटलं नव्हतं
आपण असे एकदम 'महा' होऊ म्हणून.

मग त्यांना सारं जग
वाटू लागलं थिटं
अलाणे-फलाणे
खुर्द-बुद्रुक
चिल्लर-विल्लरही
आकांक्षांपुरती तिथे गगन ठेंगणे!

मग त्यांनी आपल्या गुरुजींनाही
वेटिंगमध्ये बसवलं
अन् महापौरांनाही.
तेंव्हा ते संदर्भ शोधत होते म्हणे
'जग बदल घालुनि घाव
मला सांगुनि गेले भीमराव'
ही ओळ कुणाची म्हणून.

इथं होते तेंव्हा
काय भाषण अन्
काय भाषा, तोरा राव
अन् तिथे
मिया मिठ्ठू पोपटराव!

इथं होते तेंव्हा
मूल्य, संस्कार, संस्कृती, सभ्यता
साऱ्यांचा होलसेल, एकरकमी ठेका
ह्यांचाच नि ह्यांचाच.

तिथं गेलेन काय
कायाकल्प झाला
साक्षात्कार होतो तसा.
'काही नसतं हो तत्वबित्व,
'स्व' असतो मिलियनर
(नि 'स्वामीभक्ती एकमेव ज्वर!)

तेलही गेलं
नि तूपही तेंव्हा
त्यांना चार सिगारेटी
एकादम पिताना पाहिलं होतं
नि पाहिलं होतं
बियरचे ग्लासवर ग्लास
एकदम रिचवतानाही!

आताशा ते अम्मळ नेमस्तच...
बिन आयाळाचे सिंह.
त्याचं नेतृत्व, कर्तृत्व
एकदम गायब
कापराप्रमाणे.

त्यांचं ते माणूसपण
कधी, कुणी, कसं
हिरावलं कोण जाणे
पोपटात असलेल्या राक्षसाच्या प्राणाप्रमाणे.

नाही म्हणायला एकदा
त्यांची डायरीच लागली हाती
त्यांच्याच टेबलवर बेफिकीर पडलेली
त्यांनीच लादलेलं वेटिंग कंठताना...
गुरुजी, महापौरांप्रमाणे.

ते होते व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये
चक्रव्यूहात एकलव्यागत.
इकडे मी अँटी चेंबरमध्ये बंदिस्त
शिपाई चहा, बिसलरी देत
न सांगताही टेप सोडायचा
यू आर इन क्यू...

त्या डायरीच्या शेवटच्या
कव्हरमध्ये खुपसलेल्या पानावर
लिहिलेलं मी वाचलं
'इथं आलो मूर्खपणा केला
तिथंच बरं होतं नि बराही
जागतिकीकरणाचं स्वागत करत
उदारीकरणाचं तोरण बांधायला आसूसलेला मी
माझं मात्रं खासगीकरण झालं होतं
'स्व' ला गहाण ठेवून
इथं माझा कांचनमृग झाला,
सोन्याचा मुंगूस व्हायला आलेला मी
मजला माणसांचा मुडदूस झालाच कसा?'

आता राहणं अवघड
परतणं तर त्याहूनही.
चक्रव्यूहात अडकता येतं
सुटका नसते
हकलेपर्यंत.

माणसानं रहावं
जसे आपण असतो तसे.
उंटाचा मुका घ्यायला जायचं
अन् सायबाचा मुकादम व्हायचं?

आपलं ते रो हाऊसिंगच बरं
वन बीएचकेसारखं सुख नाही
पायापेक्षा मोठं पांघरुण नको
मिडास महाल नकोच नको.
अपना हाथ जगन्नाथ
माणूस फक्त एकनाथ!
२०१२

## शहाणं जगणं

मला जात, धर्म, वंश, कुल, गोत्र
काही नाही.
हे चांगलं की वाईट
ते काळ ठरवेल
नाहीपेक्षा त्याला ते केंव्हातरी
ठरवावेच लागेल.

मी औरस की अनौरस
स्पृश्य की अस्पृश्य
कालसंगत की कालबाह्य
मला ठावूक नाही
पण तेही एकदा
ठरेलच
कारण
काळ निर्णायक असतो म्हणे
विशेषतः समाज जेव्हा
निर्नायकी होतो तेव्हा.

मला माझे आई वडील
ज्ञात नाहीत हे खरे
पण ते नव्हतेच असे मात्र नाही.
त्यांना तुम्हीच भूतिगत केले
खरे तर भूमिगत व्हायला भाग पाडले
तुमच्या त्या तथाकथित
नैतिक, अनैतिक
भ्रामक थर्मामिटरवर
माझ्यावर आई वडील
लादले गेले नाही
हे किती बरे!

एकट्या विश्वामित्राचा
डी. एन. ए. तपासून काय उपयोग?
टेस्ट घ्यायचीच तर प्रत्येक बाळाबापाची घ्यायला हवी
निरक्षीर न्याय
तोच असेल ना?
उडदामाजी काळे - गोरे
धुतल्या तांदळासारखे किती बरे?
तेरी भी चूप मेरी भी
मी खीर खाल्ली तर बूड घागरी.

जन्मोजन्मीच्या
जात, धर्म, वंश, कुल, गोत्र
यांना शोधणे
म्हणजे आपली कबर खोदणे.
त्यापेक्षा
माणसाला 'माणूस' म्हणून स्वीकारणे
किती बरे?
**ऑगस्ट, २०१२**

## रस्ते होणाऽऽर

वर्तमानपत्रात बातमी
‘नगरोत्थान योजनेतून रस्ते होणार’
घराच्या समोरचे
परसातले,
गल्ली बोळातले
रस्ते होणार चकाचक!

माझ्या घरासमोरचा
वर्षोनवर्षे शापित रस्ता हरकला
कायाकल्प, अहिल्या उद्‌धार होणार!

मी ही बातमी
अक्षरशः सादवली
घरोघरी दवंडी पिटली
रस्ते होणार होऽऽ होणारऽऽर!

मुलं, सुना, बायको,
शेजारी, पाजारी, दुकानदार,
भांडीवाली, धुणीवाली, केरवाली,
झाडूवाली सर्वासर्वांना बातमी कळली
इतकेच काय
नातवांच्यापण कानी - मनी
बातमी पडली, अडकली
रस्ते होणाऽऽर!

मुलं खूश
त्यांना केंव्हाची चारचाकी घ्यायची होती.
सुना खूश
त्यांना टू व्हिलरचा मुहूर्त एकदासा सापडला

बायको खूश
नवऱ्यावर अवलंबून वरात एकदाची संपली.
भांडीवाली खूश
दारावरून बस सुरू होणार
नातू खूश
हात सोडून सुसाट सायकल चालणार

एकदाचं टेंडर प्रकाशित झालं खरं!
सर्व्हेवाले लेव्हल घेऊ लागले
झेंडे, शिटबोर्ड, कुली, ओव्हरसियर
लगबग साऱ्यांची सुरू झाली
खात्री रस्त्याची मनी ठसली
रस्ता होणाऽऽर!

जेसीबी, डोझर, रोलर
साऱ्यांचा खडखडाट
डंपरची घरघर
घरोघरी एकच धूम
रस्ता होणाऽऽर!

रस्ता झाला
काळा-पांढरा
तांबडा-पांढरा रस्ता जसा
मग लक्षात आलं
अर्रच्या ड्रेनेज लाइन टाकायची होती
पाण्याचे नळ वळवायचे होते
युटिलिटी शिफ्टिंगची युटिलिटीच विसरली.

परत आले
जेसीबी राक्षस
दैत्य डंपर

गंधर्व डोझर
आणि माया – मैना हरकली
रस्ते होणाऽऽर
परत परत रस्ते होणाऽऽर
नगरोत्थान होणारच होणाऽऽर!

वर्तमान पत्रात बातम्या...
नगरोत्थान की नगरसेवक उत्थान?
नगर विकास की मंत्री विकास?
ठेकेदाराची चंदी की पैशाची मंदी?
सारा गोमगाला, चोरीचा मामला
जरा हळू बोंबला!

रस्त्यावर मी रोज
पाटी वाचतो
‘काम चालू रस्ता बंद’
काम खरंच चालू असतं रोज
केलेला रस्ता उकरायचं.
कधी लेव्हल चुकली म्हणून
तर कधी पाईपची गळती म्हणून
काम रोज चालू असतं
फक्त रस्ता बंद असतो.

मजूर, मुकादम, ओव्हरसियर, इंजिनियर, ठेकेदार
रोज दिसतात रस्त्यावर
जेसीबी, डंपर, माती, मुरूम,
साऱ्यांची ओतणी, पसरणी, भरणी
असते सुरू दिवसेंदिवस
अहोरात्र, अष्टौप्रहर
काम सुरू असतं
फक्त बंद असतो रस्ता.

वर्तमान पत्रात परत बातमी
ठेकेदार काम सोडून पळाला
आता रिटेंडरिंग होणार
कारभार कसा पारदर्शी
पुनर्तरतूद होणार
गेल्यावर्षी डीपीडीसी निधीतून खर्च
यावर्षी आमदार, खासदार निधीतून
तरी रस्ते नाही झाले
तर पुढीलवर्षी खास राज्य तरतूदीतून
तरी रस्ते होणाऽऽर म्हणजे होणाऽऽर!

आता वर्तमान पत्रात बातम्याच नसतात
रस्ता होणाऽर!
वर्तमानपत्र असतात कशी चकाचक!!
न झालेल्या रस्त्यागत!
**ऑगस्ट, २०१२**

## स्थितप्रज्ञ!

मी असा बेटावर
एकठाच उभा.

किनाऱ्यावरील पक्षांचे थवे
सख्खे सोबती माझे
गिधाडांनी झडप घातली मजवर जेंव्हा
मौन, निष्क्रिय कसे ते?

मला आठवतं
गेल्या ऋतुत
अशीच गिधाडं आली होती
हुसकावून त्यांना
मी किनारपक्षी वाचवले होते

मी त्यांच्या प्रत्येक प्रसंगी उभा
छातीचा कोट करून
अन् ते माझ्यावर घाला आला तेंव्हा
काखा वर करून सरळसोट उभे?

राजकारणी, समाजकारणी
येथून तेथून सारे एक
तत्त्वज्ञानाची शेखी मिरवत
झुलतात कसे आत्ममग्न?

ती त्यांची मजबूरी असते
त्यांना त्यांच्या भात्यात
नित्य हवे असतात बाण निरनिराळे आणि नवे
नेते, कार्यकर्ते, बुद्धिवंत आणि सोमेगोमे,
अलाणे-फलाणे

त्यांचा छंदच
बाण संग्रहाचा
बोलून चालून ते बाणभट्टच ना?

त्यांना वेगवेगळे बाण हवे असतात
वेगवेगळ्या वेळी
वेगवेगळ्या कामासाठी
मात्र सगळ्यांना ठेवतात ते वेगवेगळे
धूर्तपणे!

आजकाल त्यांनी
कुल्हडमधून चहा प्यायचा सोडलाय
'यूज अँड थ्रो' ग्लास ते वापरतात आताशा
आपल्या नव्या संस्कृतीचा पुरावा म्हणून

खासगीत ते तुमचेच असतात
तुमचेच असल्याचे लुटूपुटु प्रत्यय देतात रोज
पुरावे ठेवत राहतात छुटपुट खटपटीचे
अन् ठेवतात कनवटीला बांधून
ऐनप्रसंगी उपयोग व्हावा म्हणून.

त्यांना सतत भय, भिती
पद, प्रतिष्ठा, जनमत
अन् सार्वजनिक प्रतिमेची
स्वतःच हस्ते परहस्ते निर्मिलेल्या.

ती त्यांची गरज असते
कंपल्शन असतं परिस्थितीचं
कंपल्सरी इमेज जपावीच लागते
रोज वर्तमानात उजळण्यासाठी कडक लिनन
भडक लाइम लाइट
तडक कोंडिबा टाईट!

त्यांना माझ्यासारखे
बळी घ्यावेच लागतात
नाका तोंडात पाणी जाऊ नये म्हणून
माकडाच्या आईला
बाळाच्या डोक्यावर
पाय ठेवावाच लागतो
प्राण, प्रतिष्ठा, प्रतिमा
सारं जपण्यासाठी
कोकरं बळी द्यावेच लागतात
गिधाडं पक्षांची पिले खात राहातात
प्रत्येक ऋतुत.

मी बेटावर एकटाच उभा
स्थितप्रज्ञ झाल्यापासून.
पूर्वी बेटावर
एकटाच होतो
आता भर समुद्रातही एकटाच आहे.
लाटा येऊन जातात तेंव्हा
पायाखालची वाळू सरकते
तरी मी पाय रोवून घट्ट उभा
एकटा समुद्राच्या भरती - ओहोटी विरुद्ध!

किनाऱ्यावर दगड गोटे
बगळे, डोमकावळे
नित्य उभे
'काक चेष्टा बको ध्यानम्'
मी मात्र अर्जून होऊन आता
मत्स्यभेदास कटिबद्ध!

सागराची गरज
माझी सोबत
काळ भौरे (भैरव नव्हे!)
माझे सगे - सोयरे
दिन रात
उसळत्या लाटा
माझ्या मनी
नव्या वाटा

मी माझा वंशवृक्ष
मी माझा काळपुरुष
मी एकटा
समुद्रकिनारी, भर समुद्री
स्थितप्रज्ञ!
**जानेवारी, २०१३**

## तत्त्व आणि तिलांजली

खुर्ची प्यारी खरी
पद, सत्व, मत्ता
आणखी थोडी हवी आहे.
संचार बंदी बेहत्तर
इथे स्मशान शांतता अटळ आहे.

मागच्या दाराने आलो असलो जरी
ऐरावतावर आरुढ आहोत
ऐटीत झुलण्यातच
आम्हास स्वारस्य आहे.
वादळाच्या शक्यतेनेही
वाळूत मान खुपसणारे
आम्ही बहाद्दर शहामृग
समुद्र गाज ऐकूच आली नाही म्हणून
भ्रमात खूश आहोत.
बुद्धीशी आमचे देणे - घेणे नाही
तिच्याशी काडीमोड
खुर्ची बळकावतानाच
आम्ही घेतला होता.
(किंबहुना खुर्ची बळकावली
त्याच इराद्याने होती!)

तद्दन सारे महापुरूष आम्ही
जातीय स्वार्थाच्या चौकटीत
बंदिस्त केलेत आज
उद्याच्या स्वार्थासाठी
आता आम्ही
त्यांना फुरसतीने
(अन् खरं सांगायचं तर

अम्मळ अक्कल हुशारीनेच!)
प्रोजेक्ट करतो त्यांना
आमची दुकानदारी चालावी म्हणोन

आम्ही सांगू तो इतिहास
आखू तो भूगोल
म्हणेल तो कायदा
आमचा जातीय वायदा
आमची म्हणून नवी लोकशाही आहे
ठोकशाहीच्या स्तंभांवर ती उभी
पाऊल टाकालं तर खबरदार
ही आमची प्रायव्हेट प्रॉपर्टी आहे
अन् 'पोलिटिकल सेझ पण!

सांस्कृतिक दहशतवाद आमचा अजेंडा
बालवाडीपासून विद्यापीठापर्यंत
इथं तिथं सर्वत्र
वर्तमानपत्रात अन् चॅनल्सवरही
आताशा आम्हीच असतो.
इव्हेंट मॅनेजमेंट एक्सपर्ट आम्ही
दगड, काच, खच आमचाच
बाईटस् ही असतात आमचेच!

आता उद्याच्या सर्वच पडद्यांवर
अन् वर्तमानपत्राच्या
प्रत्येक सेंटीमिटरमध्ये
आम्हीच तुम्हाला दिसू
तत्त्वांना पूर्ण तिलांजली मिळेपर्यंत.
**जानेवारी, २०१३**

## मी वाट पाहीन...

तुझ्या होकाराची
फोनची
तुझ्या 'स्वॉरी' म्हणण्याची
पश्चातापाची
तुझ्या एकांत संवादाची
मन मोकळं करण्याची
तुझ्या समर्पणाची
अंग सैल सोडण्याची
खोटा अबोला संपवण्याची
संक्रांत साडी नेसून यायची
भेटीवर भेटी स्वीकारण्याची
देईल ते घेण्याची
मनातलं द्वंद्व मिटायची
दृढ निश्चयाची
'आदर' प्रेम व्हायची
नकार होकार होण्याची
नैतिकतेची कल्पना बदलायची
हातात हात देण्याची
तुझी कळी खुलायची
अन् गालावरचा तीळ तुटायची
तुझ्या चहाच्या आर्जवाची
परत मॅकडोनाल्डला भेटायची
तुझ्या संगतीत
न संपणारा प्रवास करायची
सँट्रोतल्या त्या सुखद सहवासाची
'अरे' म्हणत हितगुजायची
'स्वीट ड्रीम' शुभेच्छांची
तुझा स्त्री हट्ट संपण्याची
ग्रीष्मात वसंत फुलण्याची

मोनोपॉजनंतरच्या बहराची
सर्वा सर्वांची
मी वाट पाहीन
जन्म सरेपर्यंत
मृत्यू येईपर्यंत!
**जानेवारी, २०१३**

## नवे जागतिकीकरण

घेऊन काही नव्हतो आलो
ठेवूनही काही जात नाही
देऊन मात्र ठेवले आहे

जगणे माझे होते
संघर्ष ठायी - ठायी
संघर्ष माझा माझ्याशीच होता
मीच निर्मिलेल्या विवेकाशी

माझा संघर्ष
आत्मसंवादच
मनाने अंतर्मनाशी साधलेला.

कळतेपणी कळाले एकच
इथे आपले कोणी नाही.

जात, धर्म, कुळ, गोत्र
नव्हते मजपाशी
लागायला पदर लागतो म्हणे
तोही नव्हता खरा.

सायासाने शिकलो - माकलो
आहेत चार भले भेटले
चार असे - तसेही.

साथ - संगत निभावत गेलो
प्रत्येक पाऊल उचलत राहिलो
जो देगा उसका भला
न देगा उसका भी.

‘त्या’ ऊंचच ऊंच भिंतीवरून
डोकावताना अन् ‘त्या’ ओलांडतानाही
यातना काही कमी नव्हत्या
साहिल्या सर्व आत्मबळावरच.

संधी नव्हती
नव्हते आरक्षण
संरक्षण मीच माझ्या
तटबंदीने उभारलेले.

शहाणपणावर अनुभवांच्या
मीच माझा बाप बनलो
नाही म्हणायला सांभाळणारी आई होती
दाई असलेली.

पोटची पोलिओग्रस्त पोर अव्हेरून
माऊलीनं पान्हा माझ्यात रुजवला
रिचवत मीच माझं रक्त तयार केलं
त्या परित्यक्त दुधातून
त्या दिवशी एक करुणाष्टक जन्मलं.

भोगलेले भोग सरावे म्हणून
वीट – वीट रचित गेलो
गनिमी हितचिंतकांनी
चिरे ढासळतील
याचीच मतलबी खबरदारी घेतली.

मी गड रचले
कारसेवकांनी ते उध्वस्त होतील
असेच पाहिजे खरे!

मी रचलेले
माणुसकीचे लक्ष इमले
रातांधळ्या मतलबींना दिसले नाही
किती बरे?

त्यांच्या हाती न लागलेलं जग
देवकी - वसुधेचा कान्हा
यशोनंदन बनून
विधायक जगाचा स्वामी
विघातक पाताळात गाढण्यास
सज्ज आहे.

माथेखोरांना मती वश नसते
हे त्रिकालाबाधित सत्य आहे
म्हणून त्रिखंडात
'सत्यमेव जयते' ची
गूज आहे, गाज आहे.

उद्याच्या जगात
माणूसपणाचा धर्म जागेल तेंव्हा
जात, धर्म, वंश, कुल, गोत्र नसेल.

फक्त माणूस आणि माणूस
तेच नव्या काळाचं
नवं जागतिकीकरण असेल
अन् नवं उदारीकरणही
स्वार्थी खासगीकरणाला बगल देणारं!
**जानेवारी २०१३**

## मौन

'मौनं सर्वार्थ साधनम्'
खरं नाही
अर्धसत्यच ते!

होकारा नकारा पलिकडचं मौन
द्वंद्वात्मक स्थितप्रज्ञता
स्वीकृतीपूर्व शांतता!

देवघरातला नंदादीप
नि तुळशी वृंदावनाची
सांजवात
अंधार - प्रकाशाची कातरवेळ
अर्धवेळाच असते
अर्धसत्याची सखी - सोबती
सख्खी बहीण.

स्पष्ट होकारापेक्षा वेगळे काही
मौन स्वीकृतीच
नैतिक भयगंडातली
झुंजूमुंजू!

विचार व्यवहार
झटापटच
किंकर्तव्यविमूढता
अर्ध होकारच!

त्याला एकतर्फी ठरवणं
कधी - कधी
सत्याचा अपलाप असतो
सुप्त होकार.

अग्रभागी स्त्री अहंमन्यता
पार्श्व पुरुषी अनुनय
या पलीकडचा एकांत संवाद
पूर्णसत्य प्रेम!
समाज बंधनात अडकलेलं
पारंपारिक मन
शीव-शिवार नवं ओलांडताना
जखमी होणं अटळ.

तारेत अडकलेलं कोकरू
बिथरलेलं, गांगरलेलं
रक्तबंबाळ
तरी सुटकेची जीवतोड.

'त्या' द्वंद्वाचं सीमोल्लंघन
शल्य मनीचं
ती सांबराची मादीच जाणो
तिला शक्यतेचाही झटका
हृदय बंद! शॉक!!

आत्मिक उर्मींच्या बळावर
पारंपारिकतेचं जंगल तुडवत
आलेली ती सांबर मादी
मनुष्य वस्तीत आत्मा शोधत होती.

किती लक्ष्मणरेषा ओलांडल्या तिनं
आत्मऊर्मींनं, आत्मबळानं
तरी जखमी, विद्ध
शेवटी गारद!
तरी हिय्या करत गावकुस ओलांडत
तिचं डौलदार सीमोल्लंघन

पुरोगामी सप्तपदी
शेवटी ठरलं ‘काळ पाऊल’
युगमुद्रा उठवणारं!

परंपरा नाकारणारं
आत्मप्रेरणाच माझं जग
माप, उंबरा नसलेलं
मनअंगण माझं जग!
**जानेवारी, २०१३**

## चमु सांगा कुणाची!

चमु सांगा कुणाची?
चॉकी देणाऱ्या
आजोबांची.

चमु सांगा कुणाची?
बुडु बुडु अंघोळीच्या
आजीची.

चमु सांगा कुणाची?
कडू-कडू औषध पाजणाऱ्या
आईची.

चमु सांगा कुणाची?
रिमोट हिसकावून घेणाऱ्या
दादुची.

चमु सांगा कुणाची?
टक्या म्हणत पापु घेणाऱ्या
बाबांची

चमु सांगा कुणाची?
भूऽ भूऽ भुकणाऱ्या
गोल्डीची.

चमु सांगा कुणाची
टॅब दाखवून न देणाऱ्या
आकुची.

चमु सांगा कुणाची?

‘चिमणी’ म्हणत
माया करणाऱ्या काकीची.

चमु सांगा कुणाची?
‘चॅप्टर’ म्हणून चिडवणाऱ्या
काकाची.

चमु सांगा कुणाची?
आई नोकरीस पळाल्यावर
सांभाळणाऱ्या संध्या मावशीची.

चमु सांगा कुणाची?
इशानी, हरिप्रिया, कांची
साऱ्या मैत्रिणींची.

चमु सांगा कुणाची?
जो प्रेम करेल
त्या सर्वांची.

**फेब्रुवारी, २०१३**

**वंचितांचा जिहाद**

गावकुसाबाहेरचा
एक गाव अजून आहे
कुणाच्याच गावी नसलेला.

त्यांना नाही जात, धर्म, वंश, कुल, गोत्र
ते आपल्याच वंशावळीत
शोधताहेत आपलाच पदर
सुताड - गुताड झालेला.

जातीअंताचा पुकारा
ठायी ठायी
माथी-माथी
जात बळकटी

जातीस स्मरून
सग्या सोयऱ्यांची वर्णी
तेज आहेत
जातीय सेझ बरकत आहेत.

सार्वजनिक न्यास
सहकारी संस्था
शाळा, विद्यापीठे
सर्वांना कुंपण
जातीय कंपूंचे
स्वार्थावर कसे अटळ उभे.

तिकडे माणूस तिष्ठत उभा
पोटाची खळगी
कष्टाचा शाप
नित्य नवा.

ते नसतात मतदार
आधार कार्ड, रेशन कार्ड नाही म्हणून
ते असतात माणूस जीव घेऊन जगत
जीव जात नाही म्हणून!

अपना हाथ जगन्नाथ
तेच त्याचे एकनाथ
कुठे आहे तो निर्मिक
अन् ते सत्यशोधक
जिहाद वंचितांचा अटळ आहे,
इतिहास, दफ्तरी
अमर नोंद होईपर्यंत.
**फेब्रुवारी, २०१३**

**समपर्णाचं आसूसलेपण**

स्वर्ग माझा सखा
आकाश ठेंगणे
माझे जीवन गाणे
सोन्याचे नाणे.

होकाराचा परिसस्पर्श
निष्पर्ण वृक्षावर वसंत
कोकीळ गाणे
मनी अंगणी.

याचसाठी होता अट्टाहास
आग्रही तपश्चर्याही
तू नाकारलं नव्हतं
हाच होकार होता.

तुझी मौन संगत
सोबतीला बोलके डोळे
उर्मीच्या अनंत खुणा
समर्पणाच्या पूर्व खुणाच होत्या.

हमरी–तुमरीवर आल्यावर
बहाण्यांनी टाळणं
चातुर्य तुझं
चाणक्यी होतं खास.

किती किती छळत राहिलीस
त्यानंच बळ दिलं पाठलागाचं
निष्ठा, व्रत
वरदान त्याचंच.

अंतरात्मा बजावत होता
तो दिवस उगवणार आहे
अस्ताचल सूर्यास्तात
सूर्योदय अपसूक आहे.

मौन दुरावा पाळला तेव्हा
ऐकू येत होते घंटानाद
अनहलनाद अंतरीचे
दूरच्या चर्चबेलचे.

आज आश्वस्त मी
पंख मला नवे
कस्तुरीगंध खुणावतोय
उद्याचे मंगल मीलन.

सरत्या सरी
कोसळणार आहेत
ढळणार एक दिवस
थोपवून धरलेले बांध.

कृत्रिम नकार
मुळातच तकलादू
टिकणार किती काळ
अंतर ऊर्मी पुढे.

वीज कडाडेल तेंव्हा
जुनं अंडरस्टँडिंग संपलेलं असेल
महापूर येईल तेंव्हा
ग्रहण सुटलेलं.

आता भेटीचे बहाणे
फोनची निमित्तं
नित्य नूतन
समर्पणाचं आसूसलेपण.
**फेब्रुवारी, २०१३**

**माझी तक्रार**

माझी तक्रार
त्या दहशतवाद्यांविरुद्ध नाही
ज्यांनी नसलेला
इतिहास उकरून काढला.

माझी तक्रार
त्या गारद्यांविरुद्ध नक्की आहे
ज्यांनी दहशतवाद्यांशी हात मिळवणी केली
अन् उत्खननाचं उदात्तीकरणही!

माझी तक्रार
त्या मूक निरीक्षकांविरुद्ध आहे
जे निमूट वाचत बसले आहेत
नसलेला इतिहास.

माझी तक्रार
मध्यमवर्गीय बघ्यांविरुद्ध नाही
असेलच तर त्या बुद्धिवाद्यांविरुद्ध
जे नेहमी सत्याचा आग्रह धरतात.
जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी.

माझी तक्रार
त्या जातीय शक्तीविरुद्ध नाही
ज्यांचा खुला अजेंडाच 'जात' असते.
माझी तक्रार झूल पांघरून
गर्दीत घुसलेल्या कोकरांविरुद्ध आहे
ज्यांनी चौकटी, फ्लेक्स, प्रतिक्रिया रंगवल्या
ते मात्र जबाबदार नागरिक होते.

माझी तक्रार त्यांच्या विरुद्ध आहे
जे निष्पापांचा बळी घेतात
आपली पोळी भाजावी म्हणून
बिनपावत्यांची दुकानं चालवणारे
भर दिवसा दरोडे घालतात
राजरोस धुळफेक करून

माझी तक्रार त्या सर्व असामाजिक तत्त्वांविरुद्ध आहे
जे आपट्यांची पानं विकून
सोन्याचा धंदा करतात.
**एप्रिल, २०१३**

## पालथ्या घड्यावर पाणी

तुझं प्रेम
माझ्या मनी
एक विचार
स्वप्न
जागरण
बेचैनी
रुखरुख
ठसठस
सारं!

माझं प्रेम
तुझ्या लेखी
एक मनोरंजन
उपहास
खेळ
विस्मरण
डेली रुटीन.

प्रेम
नसतो गेम
असेलच तर
नेम थेट
काळजाला भिडणारा!

पण
त्यासाठी
आपल्या माणसाकडं
काळीज असावं लागतं
अन् काळजीही आपल्यासाठीची!

ती येते
आत उमाळा, पाझर असेल तर
अन् दुसरा आपल्यासाठी झिजतो,
झुरतो, खंगतो, खोकतो
याची जाण नि जाणीव असेल तर
अन्यथा सारं असतं पालथ्या घड्यावर पाणी!
**जून, २०१३**

**नकार तरंग**

तुझा प्रत्येक नकार
एक कविता घेऊन जन्मलो
जखम करतो जिव्हारी
सपासप वार अंतरी!

तुझा प्रत्येक नकार
एक लाईट वेट जोक
छेद कुठे अंतरी?

तुझा प्रत्येक नकार
होकार व्हावा म्हणून
मी बदललो खेळी
तुझा मात्र ठरलेला खेळ
अळी मिळी गुप चिळी.

स्वीकार नाही
अव्हेर नाही
नकार ही नाहीच नाही,
निकाराच्या क्षणी मात्र ठरलेलं
मौन! स्वीच ऑफ!! कट!!!

समोरच्याला
मुंगसासारखं खेळवण्यात
मजाच मजा असते नाही?
पण ही काळीज नसल्याची
खूणही असते खरी!

माझी तपस्या
नामस्मरण

अनुष्ठान
आर्जव
अनुनय
तुझ्या लेखी
आणखी एक जन्म
निकराच्या नकाराचाच!
**जून, २०१३**

**या जन्मी तरी**

तू काही कर
जगाच्या लेखी...
तू एक हितचिंतक (Well-Wisher)
तू एक तिऱ्हाईत (Third Person)
स्ट्रेंजर नि पॅसेंजरच!
आणि खरं सांगायचं तर 'नो वन'च!!

तुला जे व्हावं
असावं, हवं वाटतं
ते एक मृगजळ आहे
नि मयसभाही!
जगणं एक भ्रम खरा!!

'मित्र' व्हायचं
'प्रिय' व्हायचं
'आत्मीय' व्हायचं
तर तुला दुसरा जन्मच!
या जन्मी तो 'योग' नाही,
तो 'इंद्र' तर नाहीच नाही.

या जन्मी
तू काही कर
काळीज काढून दिलं तरी
तू पायातली वहाणं
राहाणार पायातच.

फुका जीव लावू नको
हच्चा न ठेवता समर्पण नको
जग फक्त आत्मकेंद्री!

‘स्व’ च्या पलिकडे नाही त्याची एंट्री.
त्याला त्याचं तेच खरं
तू त्यांच्या लेखी
हटकलं तरी येणारं
कुत्रं, मांजर, उंदीर, झुरळ
गोंडा, शेपूट हलवत येणारं.

तुला माणूस म्हणून जगायच तर
कप्पे बंद करून जग
खोटं वाग, हवं तर देखावा कर
मग जग तुला ‘प्रिय’ मानेल
व ‘मित्र’ ही! सर्वस्वही!!
**जून, २०१३**

## कालातीत अभय

आज अर्घ्य जे ओंजळीत माझ्या
थेंब - थेंब विरणार खरे
पण ते वरदान उद्याचे - १

वर्तमान कोलाहल
निमेल तेंव्हाचे
भान खरे - २

समज नावाची गोष्ट
उन्मादी नसते कधी
शांत मनी तिची वस्ती - ३

क्षणिक स्वार्थापोटी
माणसं इतिहास रचतात खोटा
जे घडलेच नाही तो इतिहास होणार कसा? - ४

घाईचे इतिहासकार, पत्रकार
घाईच त्यांची शाई
ती युगमुद्रा बनेल कशी? - ५

काळ अटळ असतो
नि अमरही
तो हाती कुणाच्या येईल कसा? - ६

मी मी म्हणणारे
क्षण - शरण जाहले
याचि देहि याचि डोळा मी पाहिले. - ७

जेंव्हा केंव्हा ते हतप्रभ भेटतात
डोळ्यास डोळा भिडवण्याची प्रज्ञा
नसते त्यांच्या चर्म चक्षुत. – ८

अपलाप करत जगणारे
बांडगुळं असतात
भयवृक्षाची. – ९
सत्य

त्यांच्या लेखी झोपमोड
मध्यरात्री पहाट भ्रम –१०
आज नसेन मी
सभा मंची
उद्याचे विचारपीठ माझे – ११

शह, काटशह
शॉर्टकट
राजकारणाचे मार्ग खुश्कीचे. – १२

गनिमी काव्याचे
शिलालेख नसतात
काळ असतो कठोर इतिहासकार. – १३

माणसं स्वार्थांचे छोटे छोटे ताजमहाल रचतात
ते असतात वाळूचे
लाटेत एका जमीनदोस्त. – १४

क्षण – शरण की
सत्य – शरण
निर्णय काळाचा कठोर. – १५

सत्याला मरण नसतं
असेलच तर
कालातीत अभय – १६
**सव्टेंबर, २०१३**

**उद्याची प्रतिसृष्टी**

दर्दीत मी दर्द
गर्दीत मी नाही
गर्दीची गर्द मला
आताशा खुणावत नाही. - १

एकांत मला हवासा
वाचन, लेखन, विचार
मोकळी हवा प्यारी
श्वास मोकळा माझा लवासा - २

सजवलेले मंच
स्वरचित इमले
मनी माझ्या
सारे व्यर्थ शेमले - ३

उत्स्फूर्त कारंजे
नाही दिसत
दूर दिगंतरी
सारेच नकाशे कृत्रिम कसे? - ४

अहो रूपम्
अहो ध्वनी
अहोऽ काहो ऽऽ
एकमेकांचेच प्रतिध्वनी - ५

स्वरचित प्रसिद्धी
पदमोडीची प्रकाशने
समीक्षा सांगाव्याच्या
अन् पुरस्कार कटोऱ्याचे - ६

स्वांतःसुखाय पल्याड
परदुःखाचे उमाळे नाही
सर्वत्र स्वप्रतिमांची आरास
शिसारी मनी – मानसी – ७

हस्ते – परहस्ते
सर्व सार्वजनिक देखावे
लोकवर्गणीची आरती
गौरव ग्रंथही टोल वसुलीचे – ८

गर्दीविना एकांत
त्यांना सोसवत नाही
सुट्टी, सणासुदी त्यांना
जीवे कासावीस उद्यापर्यंत – ९

त्यांची प्रत्येक सार्वजनिक कृती
पूर्ण वैयक्तिक
व्यक्तिकेंद्रितही
गाफिलपणेही दुसऱ्यास प्रवेश नाही – १०

प्रतिस्पर्ध्याचं कलम
बेमालूम सफाई
हुजऱ्यांची वर्णी
जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी – ११

विरुद्ध 'ब्र'
उठूच नये,
उठलाच तर छापू नये
असतात दक्ष ते उच्चभ्रू! – १२

ते एकांतप्रिय

आताशा मला पसंत नाही
त्यांची कोणतीच कृती
गर्दीपूरक नसते कशी – १३

दर्द, गर्द, मर्द, मर्म
सारे माझे मला लकलाभ
हस्तक्षेपविरहीत शांत जग
प्रतिसृष्टीच उद्याची! – १४

**सप्टेंबर, २०१३**

**करूण क्रौर्याची इतिः श्री**

माझ्यात होता एक करूण सागर
तरुण तन-मन तहानलेला
सारखा करुणा भाकायचा
भाव भुकेला, भाबडा
रडायचा, आर्जवायचा,
हात जोडायचा, पायाही पडायचा,
गडागडा लोळायचा मनातल्या मनात,
दातही विचकायचा तोंडातल्या तोंडात.
चक्क गुलाम व्हायची पण
तयारी होती, असायची त्याची.

ती नदी अभिमानी
वळणं घेत
होकार नकारांचे
घुटमळायची
तळ्यात मळ्यात
अभिसारिका असून मानिनी!

मी नाही मिळणार
मी नाही मिसळणार
तिच्याच अहंकारानं
एकदा ती आटली.

आता तहान तिला
दुत्कारलेल्या समुद्राची
सोडलेल्या पतंगाची
पश्चाताप दग्ध ती
हताश! निराश!! निद्रानाश!!!

समुद्रच तो
उग्र असला तरी
आत खोल स्थितप्रज्ञ
करुणा आणि क्रौर्य
एकाचवेळी भोगलेला तो
प्रॉमिथियस होता तिच्यासाठी
तिला ते उमजलच नाही कधी.

त्याचा तो कातर स्वर
भरून आलेले डोळे
जोडलेले हात
करुण नव्हते
होतं ते कोरलेलं एक स्वप्न
पुनःसर्जनाचं!

तरी नदी आत्ममग्न
स्वकोशात गुरफटलेली
द्विधा, किंकर्तव्यविमूढ!

समुद्रानं सर्व पणला लावून पाहिलं
एक नाही, दोन नाही
तेच चिरकालीन द्वंद्व
चार वर्ष, चार दिशांचं.

मी नदी आहे
मातृका
माता
पत्नी
पतिव्रता
मैत्रेयी मी होणार नाही
सात जन्मात.

समुद्र तपस्वी, तपोनिधी
तरी म्हणाला
‘आय बेग यु’
‘यु आर माय लाईफ’
तरी ती टाइट.

नाही, नाही, नाही
त्रिकाल नाही
सदा सर्वकाल
नाहीच नाही.

मग समुद्र झाला
निर्वेद
निराकार
निरिच्छ
नाईलाज म्हणून!

आता त्याला रडं कोसळत नाही
मुसमुसतही नाही तो.
हात आता बांधलेले
प्रणिपात नाही त्याला सूचत
तो धीर, गंभीर
निर्मोही
दृढप्रतिज्ञ
स्वमग्न
आत्मभानी
आत्माभिमानीही!

तो दृढप्रतिज्ञ झाला
तो दिवस योगायोगानं
सीमोल्लंघनाचाच होता.

घालमेलीत
बकरी ईद उजाडली
त्यानं कुर्बानीची तयारी केली
आत्महत्येनं!

मग मात्र नदी नरमली
विचार करते म्हणाली
त्या दिवशी तिनं समुद्राची आत्महत्या
चाणाक्षपणे टळली
आणि शहर वनवासही!

दरम्यान तिनं
'मी अनिता' वाचलं
अन् ती नित्य झाली.
नैतिकतेचं वैयर्थ तिला
आत्मभानानं उमजलं
आधुनिकतेच्या आभासानं.

सरतेशेवटी
समुद्रानंच तिला समजून घेतलं.
तिला आटू दिल असतं तर
वाळवंटात विरली असती
कोरड्या किनारी सुकली असती वेल

ती असली मानिनी तरी
आतला कोपरा हळवा तिचा
कुस बदलत वहात रहायची
तिला माहित होतं
नदीला शेवटी
समुद्रालाच  मिळायचं असतं
समुद्रातच मिसळायचं असतं

प्रतिभेचा सूर्य पहायचा तर
कस्तुरीगंध घ्यावाच लागतो
आत्मउर्त्सजनच विकास असतो
नदीचं समुद्र होणं!
**ऑक्टोबर, २०१३**

**नवा शिक्षक**

नव्या युगाचा, नव्या तंत्राचा, नवा शिक्षक मी आहे
कोण मला जिंकू शकतो ते मी पाहे! ।।धृ।।

जात नाही, धर्म नाही, न मी एक पक्षाचा
तेच संकोची, जे आखडती प्रदेश समग्रतेचा
न मिटणारी असे माझी ही ज्ञाननिप्सा
अल्प –स्वल्पाने मला न कधी संतोष ना समाधान
शाळेस माझ्या मर्यादा असणे कधी न मला हे सारे
कोण मला जिंकू शकतो ते मी पाहेन ।।१।।

जिकडे तिकडे माझेच विद्यार्थी आहेत
सर्वत्र सावल्या माझ्या मला दिसताहेत.
सारे जग माझी मातृभूमी आहे
आकाशासह अवकाशही माझ्या कवेत आहे
उद्याची येणारी गोजिरी पिढी
मला नित्य खुणावते आहे
ती माझी, मी त्यांचा – अद्वैतता आमुची अभेद्य
नव्या ध्येयाचा,
नव्या ध्यासाचा, नवा शिक्षक मी आहे. ।।२।।
**डिसेंबर, २०१३**

**तू एकंदरीत झोपमोडच!**

एकंदर तू झोपमोडच!
त्रास देतेस तेंव्हा
झोपमोड.
सुखावतेस
तेंव्हाही झोपमोड.
असतेस तेंव्हाही,
अन नसतेस तेंव्हाही.
'असून अडचण
नसून खोळंबा'
म्हण तुझ्यामुळेच
अस्तित्वात आली असावी.

तुझं
बोलणं
हसणं
रुसणं
मुरका
कटाक्ष
फोन घेणं
करणं, न करणं
न येणं, केला तेंव्हा न घेणं
सारं झोपमोड.

जागेपणी ठीक आहे
पण स्वप्नातही
तू झोपमोडच असतेस
(स्वप्नमोड खरं तर!)

तुझ्या झोपमोडीची कारणं अनेक...
पत्र येणं, न येणं

एसएसएस येणं, न येणं
भेटणं, न भेटणं
बोलणं, अबेला धरणं
फोटो देणं, परत करणं
आणि परत केलेला परत मागणंही
येऊन भांडणं, मूड खराब करणं अन् नुसतं बसून राहणं.
मुद्दाम सांगितलेलं मुद्दाम न करणं
अन् न सांगायच ते हटकून सांगणं
यामुळे पण झोपमोडच

सौंदर्य प्रसाधने,
दागिने,
रंगरंगोटी
पोषाख, अपोषाख
उभार, उतार,
खाचा खोचाही!
उसासे, सुस्कारे
रोमँटिक मूड,
सेंट, नेलपेंट, क्रीम, लिपस्टिक, डिओ
फेअर अँड लव्हली असतं
त्या साऱ्यांमुळेच खरं तर!

हलणं
डुलण
लुकलुकणं
टकटक
टकमक
धकधक
अन् निरव सन्नाटाही
झोपमोडच.
**मार्च, २०१४**

# तू


आज होळी
आपण भेटलो सकाळी सकाळी
प्रथमच तू इतके इतके रंग उधळलेस
की तुला मी रंग लावायलाच विसरलो.

आज तुझा मुड काही औरच होता
आली तेंव्हा चेहरा टाकून होती
थांबलीस अन् मैफल बदलून गेली.

आज कधी नव्हे ती
तू इतकी जवळ होतीस
तन
मन
भाव
विचार
कृती
सान्निध्य
सहवास
सर्वात महत्त्वाचं म्हणजे
तुझ्या माझी असण्याची जाणीव, अहसास.

आज मी प्रथमच तुला
आतून, बाहेरून पाहिलं
मनाच्या खिडकीतून
तूही प्रथमच
होती अशी मुक्ताकंठ
मुक्तद्वार
अन् खरंतर मनमुक्त, मनमुराद.

तू अशीच असावी
रहावी
बोलावी
हसावी
रुसावी
पण असावी.
**मार्च, २०१४**



डॉ. सुनीलकुमार लवटे

मराठी, हिंदीतील
भाषांतरकार, संप
वयापासूनच विधा
मुली व महिलांचे
दोन दशके सक्रीय
असंकलित व अप्र
विद्यापीठात वि.
निर्मिती. भारताती
वस्तुसंग्रहालय म्ह
वस्तुसंग्रहालयांची
हिंदीचे अध्यापन व
राज्य, राष्ट्रीय व अ
साहित्य संमेलनाचे
अभ्यासार्थ युरोप,
भारतीय शिष्टमंडळ
अनेक प्रतिष्ठित पु
दूरदर्शन, विविध

सरल्या ऋतुचं व